नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १२३ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




गुरुवार, दि. ०२ एप्रिल २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...



### सुनेत्रा पवारांचे आयोगाला पत्र

मुंबई (स. गांवकरी) : राजकीय वर्तुळातून एक मोठी बातमी समोर आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी निवडणूक आयोगाला पाठवलेल्या एका पत्राने सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत. या पत्रात केवळ दोनच महत्त्वाच्या पदांचा स्पष्ट उल्लेख करण्यात आला असून, सुनेत्रा पवार यांचा 'राष्ट्रीय अध्यक्ष' तर शिवाजीराव गर्जे यांचा 'खजिनदार' असा उल्लेख आहे. विशेष म्हणजे, या पत्रात एकूण 14 पदाधिकाऱ्यांच्या नावांची यादी देण्यात आली असली तरी, प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्यासह इतर 12 नेत्यांच्या नावापुढे कोणत्याही पदाचा उल्लेख करण्यात आलेला नाही. प्रमुख नेत्यांच्या पदनामाबाबत ठेवलेली ही गोपनीयता राजकीय वर्तुळात सध्या मोठ्या चर्चेचा विषय ठरत आहे. अजित पवार यांच्या कार्यकाळात निवडणूक आयोगाला पाठवण्यात आलेल्या पत्रात सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांच्या पदनामांचा स्पष्ट उल्लेख करण्यात आला होता. मात्र सुनेत्रा पवार यांनी नुकत्याच पाठवलेल्या नव्या पत्रात या दोन्ही ज्येष्ठ नेत्यांच्या नावांपुढे कोणत्याही पदाचा उल्लेख टाळण्यात आल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

### तर क्षमा करा : पोंक्षे

मुंबई (स. गांवकरी) : 'मूळ मनुस्मृती वाचली असती तर ती जाळली नसती', असे विधान अभिनेते शरद पोंक्षे यांनी केले होते. या विधानावरून वाद निर्माण झाल्यानंतर आता त्यांनी माफी मागितली आहे. मूळ मनुस्मृती वाचली असती तर ती जाळली नसती, या शब्दामुळे जर माझे बंधू-बांधव दुखावले गेले असतील तर मोठ्या मनाने मला क्षमा करा. माझा कोणालाही दुखावण्याचा हेतू नव्हता, असे त्यांनी म्हटले आहे. शरद पोंक्षे यांनी आपली बाजू एका व्हिडिओच्या माध्यमातून मांडली आहे. ते म्हणाले, सध्या माझे एक वक्तव्य मीडिया फिरवत आहे. अशी नेहमीच माझी वक्तव्य तोडून-मोडून फोडून मीडियावाले फिरवत असतात. संपूर्ण भाषण कोणी कधी दाखवत नाही. माझ्या भाषणातले मागचे पुढचे सगळे कापून त्यामुळे समाजात वाद कसा निर्माण होईल, याबद्दल काळजी घेऊन नेहमी माझी वक्तव्य टाकत असतात.

### महापौर विधानावर हल्लाबोल

मुंबई (स. गांवकरी): मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी जैनमुनी नम्रमुनी यांच्या चमत्कारामुळे आपली घशाची समस्या दूर झाल्याचा दावा केला आहे. भोंदू अशोक खरातच्या काळ्या कारनाम्यांमुळे अवघ्या महाराष्ट्रात अंधश्रद्धेविरोधात संतापाची लाट उसळली असताना त्यांनी हे विधान केल्यामुळे विरोधकांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठवली आहे. खासदार संजय राऊत यांच्यानंतर आता मुंबईच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनी देखील निशाणा साधला आहे. किशोरी पेडणेकर म्हणाल्या, महापौर रितू तावडे यांना प्रत्येक भाषणानंतर सारवासारव करावी लागत आहे. असे नेहमीच का होत आहे? सध्या अशोक खरातमुळे वातावरण गरम असताना रितू तावडे मुनींसमोरच तुमच्यामुळे माझा घसा बरा झाला, असे म्हणाल्या. ॐ च्या उच्चारात प्राणायाम आहे. आपण एकदा प्राणायाम सुरू केला की ठीक व्हायला 2 वर्षे लागत नाहीत. आपल्या स्वरनलिकेवर दाब येऊन घर्षण होऊन आजार बरा होतो. मी त्या गुरुजींचा आदर करते पण आपण एकदा काही बोलतो त्याला सारवा सारव करावी लागू नये, असे म्हणत पेडणेकर यांनी तावडेंचे कान टोचले आहेत.

# ट्रम्प यांचा दावा इराणने फेटाळला

## 'युद्ध थांबवण्याची मागणी केलीच नाही', संघर्षाचा भडका उडणार?



नवी दिल्ली : (स. गांवकरी)

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्धविरामाबाबत केलेल्या विधान बुधवारी इराणने फेटाळून लावले आहे. "इराणने शस्त्रसंधी करण्याची मागणी केली आहे", असा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला होता. मात्र इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्याने ट्रम्प यांचा हा दावा 'खोटा आणि निराधार' असल्याचे म्हटले आहे. इराणच्या सरकारी टीव्हीच्या हवाल्याने रॉयटर्सने यासंबंधीचे वृत्त दिले आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे ट्रूथ सोशलवर पोस्ट करत म्हणाले होते की, इराणच्या राष्ट्राध्यक्षांनी अमेरिकेकडे युद्धविरामाची मागणी केली आहे. तसेच ट्रम्प यांनी पुढे असाही दावा केली की, त्यांनी यावर असे उत्तर दिले आहे की, जर होर्मुझची सामुद्रधुनी खुली केली गेली तरच ते युद्धविरामाचा विचार करतील. तोपर्यंत इराणवरील भीषण हल्ले सुरूच ठेवले जातील. दरम्यान इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी मंगळवारी उशिरा अल जझीरा या वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत इराणची युद्ध सुरू ठेवण्याची तयारी असल्याचे स्पष्ट केले. ते म्हणाले, "तुम्ही इराणच्या लोकांशी धमक्या आणि डेडलाईनच्या भाषेत बोलू शकत नाहीत, स्वतःचे संरक्षण करण्यासाठी आम्ही कोणतीही डेडलाईन निश्चित केलेली नाही."

डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणविरोधातील युद्धाची सद्यस्थितीची माहिती देण्यासाठी माध्यमांसमोर येण्यापूर्वी शस्त्रसंधीचा दावा करणारी पोस्ट एक्सवर केली आहे. होर्मुझ सामुद्रधुनी खुली करण्याबाबत स्पष्टता मिळत नाही तोपर्यंत अमेरिकेचे इराणवर हल्ले सुरुच राहतील असे ट्रम्प यांनी स्पष्ट केले. दरम्यान, ट्रम्प यांनी केलेल्या शस्त्रसंधीच्या दाव्याबाबत इराणकडून काही स्पष्टीकरण अद्याप समोर आलेले नाही. २८ फेब्रुवारी सुरु झालेल्या या संघर्षाला आता एक महिना पूर्ण झाला आहे. गेल्या एक महिन्यापासून सुरु असलेल्या मध्यपूर्वेतील संघर्षामुळे जगासमोर इंधन आणि गॅसचे संकट उभे आहे. इराणने भारत, पाकिस्तान, रशिया, चीन यासारख्या मित्रराष्ट्रांसाठी होर्मुझ सामुद्रधुनी केली आहे. पण, अमेरिका, इस्रायल आणि त्यांना या युद्धात मदत करणाऱ्या राष्ट्रांना होर्मुझमधून जाण्यास बंदी घातली आहे.

### अमेरिका लवकरच इराणमधून बाहेर पडणार

दुसरीकडे ट्रम्प यांनी, अमेरिका इराणविरोधातील युद्ध लवकरच संपवून शकते आणि गरज वाटल्यास 'स्पॉट हिट्स'साठी परत येऊ शकते, असेही सूचत केले. जेव्हा अमेरिकन राष्ट्राध्यक्षांना विचारण्यात आले अमेरिका हे युद्ध संपल्याचे कधी मानेल, तेव्हा ट्रम्प म्हणाले की, "मी तुम्हाला नेमकी वेळ सांगू शकत नाही... पण आम्ही लवकरच बाहेर पडू." तसेच ट्रम्प यांनी आता इराणकडे अण्वस्त्र असणार नाहीत, करण इराण ते बाळगण्यास आता असमर्थ आहे, असा दावाही ट्रम्प यांनी यावेळी केला.

### शांतता चर्चा

अमेरिका आणि इराणमध्ये सध्या शांतता चर्चा सुरु असल्याचा दावा डोनाल्ड ट्रम्प गेल्या आठवड्यापासून करत आहेत. तेहरानकडून मात्र चर्चेचा दावा फेटाळण्यात आला आहे. पाकिस्तानने उभय देशांत शांतता चर्चा घडवून आणण्यासाठी पुढाकार घेतला आहे. सुरुवातीला अमेरिकेने पाठवलेला १५ कलमी शांतता प्रस्ताव इराणने धुडकावून लावला होता. दरम्यान, ट्रम्प यांनी केलेला शस्त्रसंधीचा दावा थेट इराणकडून आला आहे का पाकिस्तानकडून याबाबतही स्पष्टता अद्याप समोर आलेली नाही.

# अशोक खरात प्रकरणात पीडित महिलांना दुहेरी धक्का?

## आधी खरातकडून लैंगिक शोषण आणि आता व्हिडीओ व्हायरल झाल्याने बदनामीची भीती

नाशिक : (स. गांवकरी)



अंकशास्त्राच्या आधारे भविष्य सांगण्याचा दावा करणाऱ्या नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाची राज्यात मोठी चर्चा सुरू आहे. अशोक खरातला बलात्काराच्या आरोपाखाली पोलिसांनी अटक केली आहे. आता भोंदू अशोक खरातची एसआयटीद्वारे चौकशी करण्यात येत असून या प्रकरणात दररोज धक्कादायक खुलासे समोर येत आहेत. याच अशोक खरातबरोबर राज्यातील अनेक दिग्गज नेत्यांचेही फोटो समोर आले आहेत. तसेच या भोंदू अशोक खरातची पाद्यपूजा करताना रुपाली चाकणकर यांचेही काही फोटो समोर आले होते. त्यामुळे रुपाली चाकणकरांवर मोठ्या प्रमाणात टीका झाली आणि अखेर त्यांना महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा तसेच राष्ट्रवादीच्या (अजित पवार) महिला प्रदेशाध्यपदाचाही राजीनामा द्यावा लागला. भोंदूबाबा अशोक खरातच्या कार्यालयातून पोलिसांना अनेक आक्षेपार्ह व्हिडीओ आढळून आल्याचं सांगितलं जातं. तसेच या प्रकरणातील काही आक्षेपार्ह व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरलही झाले आहेत. त्यामुळे राज्यात एकच खळबळ उडाली आहे. या संपूर्ण प्रकरणाची एसआयटीद्वारे चौकशी करण्यात येत असली तरी भोंदू अशोक खरात लैंगिक शोषण प्रकरणातील पीडित महिलांना दुहेरी त्रासाला सामोरं जावं लागत आहे. अशोक खरातच्या अटकेने या पीडितांचा त्रास संपलेला नाही. कारण या प्रकरणातील आक्षेपार्ह व्हिडीओ व्हॉट्सअॅप आणि सोशल मीडियाद्वारे मोठ्या प्रमाणात शेअर केले जात आहेत. त्यामुळे हेच व्हिडीओ पीडितांच्या ओळखीच्या कोणीतरी किंवा कुटुंबातील एखाद्या सदस्याने पाहिले तर? ही भीती पीडितांना सतावत असल्याचं चित्र आहे. या सततच्या भीतीमुळे म्हणजे आधी लैंगिक शोषण आणि आता हे व्हिडीओ व्हायरल झाल्यामुळे या घटनेतील पीडितांना दुहेरी त्रासाला कशा पद्धतीने सामोरं जावं लागत आहे? अशोक खरात लैंगिक शोषण प्रकरणातील सोशल मीडियावरील व्हायरल व्हिडीओ पोलिसांनी हटवण्याच्या गतीपेक्षा जास्त वेगाने व्हायरल होत आहेत.

# महाराणी ताराराणींबाबतच्या वादग्रस्त वक्तव्यावरून संताप

## सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्या समाधीस्थळी ग्रामस्थांचे एकत्रित आंदोलन; इतिहासाच्या अवमानाविरोधात शासनाकडे तक्रार

कराड (स. गांवकरी)



मुंबईत झालेल्या एका धार्मिक कार्यक्रमात जैन मुनी आचार्य नयन पद्मसागर यांनी मराठा इतिहासातील पराक्रमी व्यक्तिमत्त्व महाराणी ताराराणी यांच्याबाबत केलेल्या कथित वादग्रस्त वक्तव्याचे तीव्र पडसाद कराड तालुक्यातील तळबीड येथे उमटले आहेत. हिंदवी स्वराज्याचे सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्या समाधीस्थळी मोहिते घराण्याचे वंशज व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने एकत्र येत निषेध नोंदवला आणि संबंधित जैन मुनीवर कठोर कारवाईची मागणी केली.

सरसेनापती हंबीरराव मोहिते यांचे तळबीड हे गाव ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे आहे. मराठा साम्राज्याच्या घडणीत या भूमीचा मोलाचा वाटा असून, छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या कालखंडाशी या गावाचा घनिष्ठ संबंध आहे. महाराणी ताराराणी या त्यांच्या कन्या असल्याने तळबीडकरांसाठी त्यांचे स्थान विशेष आदराचे आहे. जैन मुनींच्या वक्तव्याच्या घटनेनंतर संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, महाराणी ताराराणी या केवळ ऐतिहासिक व्यक्ती नव्हेत, तर मराठा साम्राज्याच्या संघर्षमय काळातील नेतृत्व करणाऱ्या धैर्यशील रणरागिणी होत्या. त्या छत्रपती राजाराम महाराज यांच्या पत्नी आणि शिवाजी महाराजांच्या सुन होत्या.

औरंगजेबाच्या दीर्घ आक्रमणाला त्यांनी ठामपणे तोंड देत मराठा साम्राज्य टिकवून ठेवले, हा इतिहास सर्वश्रुत असल्याचे ग्रामस्थांनी ठामपणे सांगितले. तसेच इतिहास संशोधक जयसिंगराव पवार यांच्या संशोधनाचा दाखला देत, ताराराणींचे व्यक्तिमत्त्व लढवय्या परंपरेत घडले असल्याचे स्पष्ट करण्यात आले. त्याचबरोबर इटालियन- अमेरिकन इतिहासकार रिचर्ड इटन यांनीही त्यांच्या पराक्रमाचे कौतुक केले असल्याचे नमूद करण्यात आले. मोहिते घराण्याचे प्रतिनिधी विक्रमसिंह मोहिते म्हणाले, महाराणी ताराराणी या आमच्या घराण्याचा अभिमान आहेत. कोणतेही ठोस ऐतिहासिक पुरावे नसताना, त्यांच्याबाबत बेताल वक्तव्य करणे अयोग्य आहे.

संबंधित आचार्यांनी तत्काळ आपले वक्तव्य मागे घ्यावे आणि जाहीर माफी मागावी. या प्रकरणात ग्रामस्थांनी पुढील पाऊल उचलण्याचा निर्णय घेत तळबीड पोलीस ठाणे, सातारा जिल्हाधिकारी कार्यालय आणि राज्य शासनाकडे निवेदन देण्यात येणार असल्याचे सांगितले.









## थोडक्यात पण महत्वाचे



### 'ज्ञानदीप' काव्यसंग्रहाचे प्रकाशन

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : साहित्याच्या क्षेत्रात मोलाची भर घालणाऱ्या 'ज्ञानदीप' या प्रातिनिधिक काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा नुकताच देहू येथे उत्साहात संपन्न झाला. जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचे वंशज ह.भ.प.प्रशांत महाराज मोरे यांच्या शुभहस्ते या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी (७५० व्या) जन्मवर्षा निमित्त या विशेष काव्यसंग्रहाचे संपादन ह.भ.प.विशाल महाराज गडगे यांनी केले आहे. या संग्रहात महाराष्ट्रातील विविध नामवंत कवींच्या संत ज्ञानेश्वर महाराजां वरील दर्जेदार व भक्तिरसपूर्ण काव्य रचनांचा समावेश करण्यात आला आहे. प्रकाशन प्रसंगी मार्गदर्शन करताना प्रशांत महाराज मोरे म्हणाले की,"संत ज्ञानेश्वर महाराजांचे विचार हे काळाच्या पलीकडचे आहेत.'ज्ञानदीप' या काव्यसंग्रहाच्या माध्यमातून संतांचा हा वारसा आणि त्यांचे तत्त्वज्ञान नव्या पिढीपर्यंत पोहोचण्यास नक्कीच मदत होईल. हा संग्रह तरुण पिढीला विचारांची नवी दिशा देणारा ठरेल."या सोहळ्याला साहित्य आणि अध्यात्म क्षेत्रातील अनेक दिग्गज मान्यवर उपस्थित होते. वारकरी संप्रदायातील तसेच साहित्यिक वर्तुळातील व्यक्तींनी या उपक्रमाचे विशेष कौतुक केले कार्यक्रमाच्या शेवटी बाळा साहेब चौगुले यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### समर्थ आय.टी.आय मधील विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप' प्रदान

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : एक्साइड इंडस्ट्रिस लिमिटेड यांच्या सामाजिक दायित्व (CSR)उपक्रमांतर्गत ' एक्साईड दिक्षा स्कॉलरशिप' योजनेंतर्गत समर्थ आय.टी.आय,बेल्हे येथील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. उपक्रमांतर्गत इलेक्ट्रिशियन व फिटर या ट्रेड मधील एकूण १२ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून प्रत्येक विद्यार्थ्याला रु.४५,००० इतकी शिष्यवृत्ती देण्यात येत आहे. या शिष्यवृत्तीमुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक खर्च भागविण्यास तसेच कौशल्य विकासासाठी प्रोत्साहन मिळणार आहे. इलेक्ट्रिशियन ट्रेडमधून साहिल पावडे,साहिल पावडे,आयुष जाधव,गणेश आदक,सोहम शिंगाडे,विनोद जाधव,साहिल घोलप व कुणाल गाडगे या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.तसेच फिटर ट्रेडमधून आदित्य राजापूरे,प्रदीप मथे, शुभम सरोदे आणि जशेश शिंदे यांचा समावेशआहे.या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके,उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके,सचिव विवेक शेळके,विश्वस्त वल्लभ शेळके,जिल्हा परिषद माजी सदस्या स्नेहलताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर राजीव सावंत प्राचार्य पांडुरंग हाडवळे, उपप्राचार्य विष्णू मापारी तसेच सहकार्य करणारे शिक्षक नवाब शेख आणि निकेश औटी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



### निसर्गाशी मैत्री करा आणि आनंदी रहा- राहीमावशींचा विद्यार्थ्यांशी संवाद

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : हिंद सेवा मंडळाच्या ज्ञानवर्धिनी प्राथमिक शाळा व बालकमंदिर येथे क्रीडा व कला स्पर्धांचे उर्वरीत पारितोषिक वितरण पद्मश्री राहीबाई पोपेरे यांच्या शुभहस्ते उत्साहात संपन्न झाले. याप्रसंगी त्यांनी चिमुकल्यांशी संवाद साधताना निसर्गाचे महत्त्व पटवून दिले. प्रत्येकाने आपल्या घराजवळ एक तरी झाड लावले पाहिजे व त्याचे संगोपन केले पाहिजे. नैसर्गीक फळझाडे 'पालेभाज्या ' रानभाज्या तुमच्या घरच्या व शाळेच्या परसबागेत वाढविल्या पाहीजेत . घरची परिस्थिती कशीही असो लढायला शिका . सातत्याने पुढे जात रहा . प्रत्येक घरातील कन्या ही त्या घराची 'परिसराची लक्ष्मी असते तिला शिक्षणाच्या प्रवाहात आणले पाहिजे व माझ्यासारख्याच अनेक पद्मश्री या निसर्गसंपन्न अकोले तालुक्याच्या मातीतून पुढे आल्या पाहिजे अशा भावना व्यक्त केल्या . विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाबरोबर शारीरिक विकासही झाला पाहिजे यासाठी शाळेत शिक्षक आणि पालकांनी त्यांना संधी उपलब्ध करून दिली पाहिजे तसेच मुलांच्या आहारात हिरव्या पालेभाज्यांचा समावेश असावा जंक फूड टाळवेत त्याचे आपल्या शरीरावर होणारे दुष्परिणाम राहिमावशींनी मुलांना समजावून सांगितले. याप्रसंगी इ.३ री व ४ थी च्या विद्यार्थीनींनी रंगभरण स्पर्धेतून राहिमावशींचे सुंदर रंगभरण केलेले चित्र त्यांना भेट म्हणून दिले . शाळेचे मुख्याध्यापक श्री. रावसाहेब नवले यांनी प्रास्ताविक व पदमश्री राहिमावशी यांचा संघर्षमय सातत्यपूर्ण जीवन परिचय करून दिला.

# महिलांनी आंधळा विश्वास ठेवू नये – नानजीभाई ठक्कर

## भोंदू बाबाच्या प्रकरणाने देश हादरला; अंधश्रद्धेविरुद्ध सावध राहण्याचे आवाहन!

(स. गांवकरी)



महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील मिरगाव मंदिर ट्रस्टशी संबंधित 'बंदुबाबा' उर्फ अशोक खरात याला पोलिसांनी १८ मार्च रोजी अटक केल्यानंतर संपूर्ण राज्यातच नव्हे तर देशभरात खळबळ उडाली आहे. गेल्या तीन वर्षांपासून एका महिलेवर बलात्कार केल्याचा आरोप त्याच्यावर असून, त्याच्या मोबाईलमध्ये ३०० हून अधिक महिलांशी संबंधित माहिती व तक्रारी आढळल्याचे समोर आले आहे. 'जलमंत्र' देण्याच्या नावाखाली महिलांचा विश्वास संपादन करून त्यांचा गैरफायदा घेतल्याचा आरोप या प्रकरणात करण्यात आला आहे.

या प्रकरणात काही राजकीय पक्षांचे नेते, महिला आघाडीच्या पदाधिकारी आणि समाजातील विविध स्तरांतील व्यक्तींचाही त्याच्याशी संपर्क असल्याची माहिती समोर आली आहे. अनेक महिलांनी श्रद्धेपोटी या तथाकथित बाबावर विश्वास ठेवला; मात्र त्याच विश्वासाचा गैरफायदा घेत गंभीर प्रकार घडल्याचे उघडकीस आले आहे. संबंधित काही व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत असल्याने समाजात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर समाजामध्ये अंधश्रद्धेविरुद्ध जागृती करण्याची गरज अधिक तीव्र झाली आहे. महिलांनी अशा भोंदू बाबांवर आंधळेपणाने विश्वास ठेवू नये, सावधगिरी बाळगावी आणि कोणत्याही प्रकारच्या 'चमत्कार' किंवा 'उपायां'च्या आमिषाला बळी पडू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. महिलांची सुरक्षा ही सर्वात महत्त्वाची असून, कोणत्याही अज्ञात व्यक्तीकडे वैयक्तिक समस्या सोडवण्यासाठी जाणे धोकादायक ठरू शकते, असे मत व्यक्त करण्यात आले. "श्रद्धा ठेवणे चुकीचे नाही; मात्र अंधश्रद्धेच्या आहारी जाणे धोकादायक आहे. अनेक लोक वैयक्तिक स्वार्थ, पद, लाभ किंवा समस्या सोडवण्याच्या आशेने अशा भोंदू बाबांकडे जातात. पण हा मार्ग चुकीचा असून, त्यातून फसवणूक आणि शोषणच होते," असे नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांनी स्पष्ट केले.

समाजामध्ये अंधश्रद्धेविरुद्ध गेल्या अनेक वर्षांपासून जागृती केली जात असल्याचे त्यांनी सांगितले. "आम्ही गेल्या ५० वर्षांपासून गावोगावी फिरून लोकांना जागृत करत आहोत. श्रद्धा असावी; पण विवेकही असला पाहिजे. कोणताही बाबा, बुवा किंवा ढोंगी व्यक्ती तुमचे नशीब बदलू शकत नाही," असे ते म्हणाले.

पूर्वी लोणावळा येथील एकवीरा मंदिर परिसरात बकऱ्यांचा बळी देण्याची प्रथा सुरू होती. मात्र जागृती मोहिमेमुळे आणि प्रशासनाच्या सहकार्याने ही प्रथा थांबवण्यात यश आले. मंदिर परिसरात 'बळी प्रथा बंदी' असा फलक लावण्यात आला असून, समाजाने या निर्णयाला सकारात्मक प्रतिसाद दिला, असे त्यांनी नमूद केले.

समाजातील काही लोक अजूनही अशा खोट्या बाबांच्या नादी लागतात, ही चिंतेची बाब असल्याचे त्यांनी सांगितले. विशेषतः महिलांनी अशा ठिकाणी जाणे टाळावे, तसेच कोणत्याही प्रकारच्या 'उपायां'च्या नावाखाली होणाऱ्या फसवणुकीपासून दूर राहावे, असे आवाहन करण्यात आले.

"कठोर परिश्रम, योग्य विचार आणि विवेक यांच्याशिवाय यश मिळत नाही. कोणताही ढोंगी बाबा तुमच्या आयुष्यात बदल घडवू शकत नाही. अंधश्रद्धेपासून दूर राहा आणि सत्य, विज्ञान व समज यांचा मार्ग स्वीकारा," असेही त्यांनी सांगितले.

या घटनेमुळे समाजात जागरूकता वाढण्याची गरज अधोरेखित झाली असून, महिलांनी आणि नागरिकांनी कोणत्याही भोंदू व्यक्तीपासून दूर राहावे, संशयास्पद प्रकार तात्काळ पोलिसांना कळवावेत आणि सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे, असे आवाहन शेवटी करण्यात आले आहे.

## भाजपकडून अक्षय शिवाजीराव कर्डिले यांना उमेदवारी

राहुरी : (स. गांवकरी)



राहुरी विधानसभा पोट निवडणुकीसाठी अखेर भाजपाने दिवंगत आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे पुत्र अक्षय कर्डिले यांना उमेदवारी जाहीर करत राहुरीतील भाजपा उमेदवाराचा पत्ता ओपन केला आहे. राहुरीची निवडणूक बिनविरोध होणार ! भाजपचा उमेदवार कोण असणार ! तनपुरे आणि कर्डिले यांच्यात लढत होणार का ! या सर्व प्रश्नांना नक्कीच उमेदवारी जाहीर झाल्याने पूर्णविराम मिळाल्याचे स्पष्ट झाले आहे . दिवंगत आमदार शिवाजीराव कार्डिले यांच्या निधनानंतर ही पोटनिवडणूक २३ एप्रिल २०२६ रोजी मतदान होणार आहे . अक्षय कर्डिले कै आमदार कर्डिले यांचे चिरंजिव आहेत. शिवाजीराव कर्डिले यांचे गेल्यावर्षी 17 ऑक्टोबर रोजी त्यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. शिवाजीराव कर्डिले हे राहुरी विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे विद्यमान आमदार होते. शिवाजी कर्डिले हे 2009 मध्ये अपक्ष म्हणून प्रथम निवडून आले होते. त्यानंतर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस कडून लोकसभा निवडणूक लढवली होती, त्यात त्यांचा पराभव झाला होता. 2014 ला पुन्हा आमदारकी लढवत त्यांनी विजय प्राप्त केला. 2019 च्या निवडणुकीत त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले होते. 2025 मध्ये राहुरीत कर्डिले पुन्हा निवडून आले होते . त्यांच्या दुःखद निधनामुळे ही पोटनिवडणूक होत असून राहुरी मधील ही दुसरी पोटनिवडणूक मानली जाते.

## मणिपाल हॉस्पिटल : बाणेर येथे ७७ वर्षीय महिलेचे अवयवदान

- यकृत व मूत्रपिंड प्रत्यारोपणातून तिघांना जीवनदान
- गंभीर वैद्यकीय परिस्थितीतही सुयोग्य समन्वय आणि अतिदक्षता उपचारांमुळे अवयव प्रत्यारोपण शक्य

पुणे : (स. गांवकरी)



७७ वर्षीय एका महिलेला बेशुद्ध अवस्थेत आणि अत्यंत गंभीर श्वसन अडचणींसह मणिपाल हॉस्पिटल्स, बाणेर, पुणे येथील आपत्कालीन विभागात दाखल करण्यात आले. तातडीने त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले. मेंदूचा त्वरित सीटी स्कॅन केल्यावर मोठ्या प्रमाणात इंट्राक्रॅनियल हेमोरेज (मेंदूत रक्तस्राव) झाल्याचे दिसून आले, ज्यामुळे मेंदूचे गंभीर आणि अपरिवर्तनीय नुकसान झाले होते. या प्रकरणाबाबत बोलताना, मणिपाल हॉस्पिटल्स, बाणेर, पुणे येथील न्यूरोसर्जन डॉ. सारंग गोटेचा म्हणाले , " रुग्णाला मेंदूत मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला होता, ज्यामुळे मेंदूचे गंभीर आणि अपरिवर्तनीय नुकसान झाले. तपासणीत हे स्पष्ट झाले की रुग्णाची स्थिती अत्यंत गंभीर असून उपचारांनी परिणाम बदलणे शक्य नव्हते. तरीही आमच्या टीमने शक्य तितकी सर्व सहाय्यक उपचार सेवा सुरू ठेवली. अशा परिस्थितीत कुटुंबाशी वेळेवर आणि पारदर्शक संवाद साधणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. कुटुंबीयांनी अवयवदानाचा घेतलेला निर्णय त्यांच्या धैर्य आणि संवेदनशीलतेचे प्रतीक आहे. " मणिपाल हॉस्पिटल्स, बाणेर, पुणे येथील क्रिटिकल केअर मेडिसिन विभागप्रमुख डॉ. भूषण नगरकर म्हणाले , " मेंदूमृत्यूच्या परिस्थितीत अवयव कार्यक्षम ठेवण्यासाठी अत्यंत काटेकोर उपचार आणि सतत निरीक्षण आवश्यक असते. रुग्णाला आमच्याकडे आणले तेव्हा तिची स्थिती अत्यंत गंभीर होती आणि न्यूरोलॉजिकल नुकसान अपरिवर्तनीय होते. सर्व प्रयत्नांनंतरही तिला वाचवता आले नाही. अशा कठीण प्रसंगी कुटुंबीयांनी अवयवदानाचा घेतलेला निर्णय खरोखरच कौतुकास्पद आहे. आमच्या टीमने सतत प्रयत्न करून रुग्णाची शारीरिक स्थिती स्थिर ठेवली, ज्यामुळे अवयव यशस्वीरित्या संकलित करता आले आणि अनेक रुग्णांना नवजीवनाची संधी मिळाली." कुटुंबीयांची संमती मिळाल्यानंतर बहुविभागीय तज्ज्ञांच्या टीमने अवयवदानाची प्रक्रिया सुरू केली. अवयव कार्यरत ठेवण्यासाठी रुग्णाला अत्याधुनिक लाइफ सपोर्टवर ठेवण्यात आले. यात रक्तदाब, ऑक्सिजन पातळी आणि अवयवांपर्यंत रक्तपुरवठा यांसारख्या महत्त्वाच्या घटकांचे सतत निरीक्षण आणि नियंत्रण आवश्यक होते. झोनल ट्रान्सप्लांट कोऑर्डिनेशन सेंटर (ZTCC) यांच्या समन्वयाने प्रतीक्षा यादीनुसार एक यकृत आणि दोन मूत्रपिंडे यशस्वीरित्या संकलित करण्यात आली.

## मुंगशी फ्रेडर ६ ते १० लोडशेडिंग तात्काळ बंद

"जनतेचा प्रश्न, आमची जबाबदारी!" दत्ता नाना पवार व राहुल दादा शिंदे पाटील यांची ठाम भूमिका

### प्रवीण करपे यांच्या मागणीला यश

पारनेर : (स. गांवकरी)

पारनेर तालुक्यातील मुंगशी गावात दररोज रात्री ६ ते १० या वेळेत होणाऱ्या लोडशेडिंगमुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली होती. विद्यार्थ्यांचे परीक्षा काळात मोठे नुकसान होत असल्याने तसेच परिसरात बिबट्याच्या हालचालीमुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

या पार्श्वभूमीवर प्रवीण करपे यांनी संबंधित विभागाकडे ठाम मागणी करत लोडशेडिंग तात्काळ बंद करण्याची भूमिका घेतली होती. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले आहे.

सहाय्यक अभियंता पिसाळ साहेब यांनी परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ लाईट सुरू करण्याचे निर्देश दिले. त्यामुळे रात्री ६ ते १० या वेळेत होणारी लोडशेडिंग बंद करण्यात आली आहे.

यावेळी भाजप तालुका अध्यक्ष राहुल दादा शिंदे पाटील व दत्ता नाना पवार यांचेही मार्गदर्शन लाभले. त्यांच्या सहकार्यामुळे प्रशासनाने सकारात्मक निर्णय घेतला .

मुंगशी येथील लोडशेडिंग संदर्भात निवेदन देताना राहुल पाटील शिंदे – भाजप तालुका अध्यक्ष,दत्ता नाना पवार,मनोज मुंगसे – सरपंच डॉ. विलास काळे – सरपंच,अनिल दिवटे,प्रशांत करपे,सुनील नलगे,शुभम गाडेकर उपस्थित होते.



"मुंगशी गावातील ६ ते १० या वेळेतील लोडशेडिंगमुळे विद्यार्थ्यांना व नागरिकांना त्रास होत होता. आम्ही तात्काळ वीज विभागाकडे पाठपुरावा केला आणि ही लोडशेडिंग बंद करण्यात आली. जनतेच्या प्रश्नांसाठी आम्ही नेहमीच पुढे राहू.

**-राहुल पाटील शिंदे. (भाजप तालुका अध्यक्ष.)**

ग्रामस्थांच्या अडचणी आम्हाला मान्य नव्हत्या. रात्रीच्या लोडशेडिंगमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली होती. आम्ही संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली

**-दत्ता नाना पवार**

## स्मशानभूमीत जळत्या चितेवर टाकले मृत कोंबडे

आळेफाटा : (स. गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथे धक्कादायक अघोरी प्रकार उघडकीस आला आहे. येथील स्मशानभूमीत चितेवर रविवारी(ता.२९) गावठी कोंबडा पाय बांधलेल्या अवस्थेत टाकला असल्याचे ग्रामस्थांना दिसून आले. या प्रकारामुळे परिसरात घबराटीचे आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. पिंपळवंडी(ता.जुन्नर) येथील गावठाण परिसरातील स्मशानभूमीत दोन दिवसांपुर्वी एक अंत्यविधी करण्यात आला होता.शनिवारी व तिसऱ्या दिवशी रविवारी सावडण्याचा कार्यक्रम न करता तो सोमवारी करण्याचे ठरवण्यात आले होते. अज्ञात व्यक्तींनी जळालेल्या चितेवर मृत कोंबडा टाकला असल्याचे रविवारी ग्रामस्थांना आढळून आले. सध्या अंधश्रद्धेचे प्रमाण सगळीकडे मोठ्या प्रमाणात वाढत असुन. पिंपळवंडी



सारख्या मोठ्या गावात अघोरी प्रकार घडला असल्याने ग्रामस्थांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. सदर घटनेची माहिती नागरिकांनी गावचे पोलीस पाटील इरफान तांबोळी यांना कळवली असता त्यांनी आळेफाटा पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक अनिल पवार यांना या घटनेबद्दल माहिती दिली. पवार यांनी सांगितले की या घटनेची चौकशी करून संबंधित व्यक्तींवर कारवाई करण्यात येईल.तसेच या प्रकारच्या घटना थांबवण्यासाठी जनजागृती करू. स्मशानभूमी परिसरात सी.सी. टी.व्ही. कॅमेरे बसविण्याची मागणी यावेळी ग्रामस्थांनी केली आहे.

# हंडा मोर्चापासून नगराध्यक्षपदापर्यंतचा प्रेरणादायी प्रवास

### लोकनेत्या जनाबाई खातळे

(स. गांवकरी)

इगतपुरी नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षा स्व. जनाबाई खातळे यांच्या घराण्यात कोणताही राजकीय वारसा नसतांना त्यांनी आपल्या बुद्धीने व कतृत्वाने नगरसेवक ते नगराध्यक्षा पर्यंत मजल मारली. इगतपुरी नगरपरिषद हद्दीतील जुना गावठा म्हणून प्रभाग आहे. फार वर्षांपूर्वी कावनई म्हणून इगतपुरी तालुक्याची ओळख होती. इगतपुरी शहर वसन्यापूर्वी या जुन्या गावठ्याची ओळख आहे. इंग्रज राजवटीत मुंबई ते भुसावळ रेल्वे मार्ग इगतपुरीतून गेल्यावर कालातंराने इगतपुरीचे तालुक्यात रूपांतर झाले. असा हा जुना गावठा जवळपास आठशे फुट उंचीवर असल्याने या ठिकाणी इगतपुरी नगरपरिषदेचे पिण्याचे पाणी वेळेवर येत नसल्याने या ठिकाणी राहणाऱ्या महिलांना पिण्याच्या पाण्यासाठी दोन किलोमीटर अंतरावरून डोक्यावर हंडे घेऊन पाणी आणावे लागत असे. महिलांचा हा त्रास पाहून जनाबाई खातळे यांनी येथील महिलांना एकत्र करून नगरपरिषदेवर पहिला हंडा मोर्चा काढून तत्कालीन मुख्यधिकारी यांना घेराव घातला. या हंडा मोर्चाची दखल घेत मुख्याधिकारी यांनी गावठा परिसरात पाण्याची सोय करण्याची हमी दिली. आणि येथुनच जनाबाई



खातळे यांच्या राजकीय प्रवासाला सुरुवात झाली. पुढे होऊ घातलेल्या इगतपुरी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीत येथील नागरिकांनी पुढाकार घेऊन जनाबाई खातळे यांना प्रचंड मताने निवडून दिले. नगरसेवक म्हणून राजकीय प्रवासाची सुरुवात होताच जनाबाई खातळे यांनी या

**शब्दकंन - संजय ( आप्पा ) खातळे**

ठिकाणी पिण्याच्या पाण्यासाठी नगरपरिषद निधी मंजूर करून पाण्याची टाकी बांधुन पिण्याच्या पाण्याची सोय केली. गावठा येथे हनुमान मंदीरात शाळा भरत होती. खातळे यांनी नगरपरिषदेच्या निधीतून पहिल्यांदाच दोन वर्ग खोल्या बांधुन १ ली ते ४ पर्यंत जिल्हा परिषदेची शाळा सुरू केली. गावठा परिसरात जाण्यासाठी फक्त पायवाट होती रस्ता नव्हता मात्र नगरसेविका म्हणून खातळे यांच्या कार्यकाळात या ठिकाणी सिमेंट काँक्रीटीकरण रस्ता मंजूर करण्यात आला. गावठा परिसरात त्याकाळी ५० पेक्षा अधिक कुटुंबे वास्तव्यात होती. या ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांत काही वाद झाल्यास हा वाद पोलीस ठाण्यात न जाता हा वाद जनाबाई खातळे सामस्याने सोडवत असत. त्यामुळे येथील नागरिकांनी त्यांना तीन वेळेस सलग नगरसेवक म्हणून निवडून दिले. इगतपुरी शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी नगरपरिषदेचा तलाव होता. मात्र दरवर्षी मार्च एप्रिल महिन्यात तळ्याचे पाणी आटल्यानंतर इगतपुरी वासियांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत असे. नगरपरिषदेच्या तलावातून गाळ काढल्यास पाण्याची पातळी वाढली जावी यासाठी प्रथमच जनाबाई खातळे यांनी गोंदे येथील सैमसोनाईट कंपनीच्या अधिकाऱ्यांना भेटून कंपनीच्या सीएसआर फंडातून तलावातील गाळ उपसा करून तलावाच्या पाण्याची पातळी वाढवली. मात्र शहर विकसीत होत असल्यामुळे हे पाणीही कमी पडत असल्याने पुढील काळात जनाबाई खातळे यांना नगराध्यक्ष पदाची संधी चालून आल्यावर त्यांनी नगराध्यक्ष कार्यकाळात इगतपुरी शहराला चोवीसतास पाणीपुरवठा व्हावा म्हणून सर्व नगरसेवकांना विश्वासात घेऊन तत्कालीन पाणीपुरवठा मंत्री यांची भेट घेऊन भावली धरणातून इगतपुरी शहराला पाणीपुरवठा योजना मंजूर करून आणली. आज त्याच योजनेतून भर उन्हाळ्यातही भावली धरणातुन आणलेल्या पाण्याचा वापर केला जात आहे.

जनाबाई खातळे यांच्या कार्यकाळात नागपुर ते मुंबई समृद्धी महामार्ग प्रस्तावित असतांना तळोघ तळोशी येथील नागरिकांचा महामार्गाला जमीन देण्यासाठी विरोध होता. मात्र खातळे यांनी येथील नागरिकांची भेट घेऊन पुढील दुरदृष्टी समजून सांगत इगतपुरी तालुक्याच्या विकासासाठी समृद्धी महामार्गाचा कसा फायदा होईल हे समजून सांगितल्यावर त्यांचा विरोध मावळल्यावर समृद्धी महामार्गाला जमीन देण्यासाठी समंती दर्शवल्यानेच मागील दोन वर्षापूर्वी हिंदू हृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे मुंबई ते नागपुर समृद्धी महामार्गाचे लोकार्पण करण्यात आले. इगतपुरी तालुक्याला निसर्गाचं मोठे वरदान लाभले असून इगतपुरीचे इंद्रपुरीत रुपांतर करून या परिसराला पर्यटनस्थळ म्हणून विकसित करण्याचे स्वप्न जनाबाई खातळे यांनी पाहत पुढाकार घेऊन तत्कालीन पर्यटनमंत्री जयकुमार रावल यांची भेट घेऊन इगतपुरीच्या पर्यटनासाठी पाठपुरावा केला. मात्र त्यांचे हे अपुरे राहात असतानाच या वर्षी झालेल्या इगतपुरी नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत त्यांच्या सुनबाई शालिनी संजय खातळे यांना नगराध्यक्षा म्हणून इगतपुरीच्या नागरिकांनी भरघोस मतांनी निवडून दिले. शिवसेनेचे युवानेते संजय खातळे व नगराध्यक्षा शालिनी खातळे यांनी जनाबाई खातळे यांनी इंद्रपुरीचे पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावा हीच खरी स्व. जनाबाई खातळे यांना श्रद्धांजली ठरेल.

## थोडक्यात पण महत्वाचे




### भिगवण येथे भाजपचे निवासी शिबिर; मोठ्या संख्येने सहभागी व्हावे : गारटकर

इंदापूर (स. गांवकरी) : "भारतीय जनता पक्षाचा गाभा हा संघटन आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांनी अधिक सक्षम आणि सक्रिय होण्यासाठी येत्या ८ व ९ एप्रिल रोजी भिगवण येथे आयोजित करण्यात आलेल्या एक दिवसीय निवासी शिबिरात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे," असे आवाहन भाजपचे ज्येष्ठ नेते प्रदीप गारटकर यांनी केले. इंदापूर येथे रविवार (दि. २९ मार्च) रोजी गारटकर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी भाजप नेते प्रवीण माने, विलासराव वाघमोडे, अभिजीत तांबिले, माऊली चौरे, अण्णा काटे, हनुमंत बनसुडे, उमाताई इंगोले, विष्णू चव्हाण, भजनदास पवार, सतीश पांढरे, मयूर शिंदे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी नगराध्यक्ष विठ्ठल ननवरे यांनी केले. गारटकर म्हणाले, "एकटा व्यक्ती काहीही करू शकत नाही. संघटनाच्या बळावरच मोठी कामे उभी राहतात. १९७८ पासून आजपर्यंत विविध क्षेत्रात काम करताना कार्यकर्त्यांच्या साथीत अनेक यशस्वी उपक्रम राबवता आले. देशाला बलशाली बनवण्यासाठी तरुणांसाठी भाजप हे मोठे व्यासपीठ आहे." तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य सरकार प्रभावी काम करत असल्याचे त्यांनी नमूद केले. दरम्यान, गारटकर यांच्या वाढदिवसानिमित्त मित्रपरिवार व विविध संघटनांच्या कार्यकर्त्यांनी विविध सामाजिक उपक्रम राबवत त्यांचा वाढदिवस साजरा केला.



### इंदापुरात 'इंडाकॉन २०२६' वैद्यकीय परिषद उत्साहात संपन्न !

इंदापूर (स. गांवकरी) : भारतीय वैद्यकीय संघटना (IMA), इंदापूर शाखा आणि आयएमए फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'इंडाकॉन २०२६' (INDACON 2K26) ही दोन दिवसीय भव्य वैद्यकीय परिषद नुकतीच यशस्वीरित्या पार पडली. "सेवाभाव आणि कृती: स्थानिक काळजी, जागतिक मानके" (Compassion in Action: Local Care, Global Standards) तसेच 'स्थानिक सेवा, जागतिक दर्जा'चा मंत्र! या संकल्पनेवर आधारित असलेल्या या परिषदेने वैद्यकीय क्षेत्रातील आधुनिक बदलांचा वेध घेतला. दिमाखदार उद्घाटन सोहळ्याने या परिषदेचा आरंभ झाला. शनिवार, २१ मार्च रोजी इंदापूर-अकलुज लिंक रोडवरील 'डॉ. नीतू मांडके आयएमए हाऊस' येथे परिषदेचा मुख्य उद्घाटन सोहळा पार पडला. प्रमुख पाहुणे म्हणून पद्मश्री डॉ. विकास महात्मे (माजी खासदार व संस्थापक, महात्मे आय बँक) यांनी आपल्या मार्गदर्शनात वैद्यकीय क्षेत्रातील सेवाभावाचे महत्त्व अधोरेखित केले. डॉ. जयंत नवरंगे (अध्यक्ष, आयएमए महाराष्ट्र कायदेशीर समिती) यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषवले.

### नाशिक-कल्याण लोकल बाबत केंद्राकडून "एप्रिल फुल"

नवी दिल्ली (स. गांवकरी) : नाशिक–कल्याण दरम्यान लोकल (EMU) रेल्वे सेवा सुरू करण्याच्या दीर्घकालीन मागणीवर केंद्र सरकारने पुन्हा एकदा टोलवाटोलवीची भूमिका घेतल्याचे समोर आले आहे. खासदार राजाभाऊ वाजे यांनी लोकसभेत हा मुद्दा पुन्हा एकदा उपस्थित करत रेल्वे मंत्रालयाला जाब विचारला. मात्र मंत्रालयाने दिलेले उत्तर हे तांत्रिक कारणांवर आधारित आणि ठोस कालमर्यादेविना असल्याने पुन्हा एकदा घोर निराशा नाशिकरांच्या पदरी पडली आहे. खासदार वाजे यांनी विचारलेल्या प्रश्नात नाशिक रोड ते कल्याण या मार्गावर लोकल सेवा सुरू करण्याची मागणी ही केवळ सुविधा नसून अत्यावश्यक गरज असल्याचे अधोरेखित केले. विद्यार्थी, शेतकरी, लघु व्यापारी आणि रोजंदारी करणारे हजारो प्रवासी दररोज या मार्गावरून प्रवास करतात. मधल्या अनेक स्थानकांवर एक्सप्रेस गाड्या थांबत नसल्याने प्रवाशांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागतो. गेल्या दोन वर्षांत हा मुद्दा विविध माध्यमांतून १० ते १५ वेळा उपस्थित करूनही कोणताही ठोस निर्णय न झाल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. रेल्वे मंत्रालयाने आपल्या उत्तरात कसारा–कल्याण–छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस या मार्गावर आधीच ३६ उपनगरी गाड्या सुरू असल्याचे नमूद केले. तसेच नवीन EMU सेवा सुरू करणे हे मार्गाची क्षमता, उपलब्ध पाथ, रोलिंग स्टॉक, पायाभूत सुविधा आणि देखभाल व्यवस्थेवर अवलंबून असल्याचे सांगितले. मात्र, सर्वात महत्त्वाची अडचण म्हणून मंत्रालयाने कसारा–इगतपुरी घाट विभागातील बोगद्यांची मर्यादित रुंदी अधोरेखित केली. EMU गाड्यांची रुंदी अधिक असल्याने सध्या या मार्गावर लोकल सेवा चालवणे शक्य नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. दरम्यान, अडचणी दूर करण्यासाठी कोणती ठोस उपाययोजना केली जाणार, नवीन तंत्रज्ञानाचा वापर होणार का, तसेच ही सेवा नेमकी कधी सुरू होणार याबाबत मंत्रालयाने कोणतीही स्पष्ट भूमिका मांडलेली नाही.

# ट्रकला दुचाकी आडवी लावून लुटमार

## आरोपीस १२ तासात केले जेलबंद जामखेड पोलीसांची कामगिरी

जामखेड : (स. गांवकरी)



दि.३१/०३/२०२६ रोजी फिर्यादी नामे संतोष बिभीषन फरताडे धंदा ड्रायव्हर रा. सोमनाथ वाडी ता.जि. बीड यांनी फिर्याद दिली की, दि. ३०/०३/२०२६ रोजी मी व बाळू शामराव तांबे रा. परांडा जि.धाराशिव असे ट्रक क्र. MH१४LX९९६९ ही मध्ये कोबंडीचे खादय घेवून पुणे येथून माजलगावकडे जात असताना दि.३१/०३/२०२६ रोजी रात्री ००.३० वा.चे सुमारास जामखेड ते साकत रोडने जामखेड पासून ५ की मी अंतरावर स्पीड ब्रेकर आल्याने आम्ही गालीचा स्पीड कमी केला तेंव्हा एक स्कुटीवरील स्वार हा त्याची स्कुटी घेवून आला व आमचे ट्रकसमोर समोर आडवी लावून आमची ट्रक थांबवली. आमची ट्रक थांबल्यानंतर मोटारसायकलवर इतर तीन लोक आले व त्यांनी ट्रकची काच फोडून आम्हाला मारहान करून चाकुचा धाक दाखवून बळजबरीने खिशातील रोख रक्कम व गाडीतील साहीत्य काढून घेतले. वैगेरे म // चे फिर्यादीवरून जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा रजि. नं.१७५/२०२६ बी एन एस कलम ३०९ (६),३२४(४), ३ (५), प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांनतर सदर आरोपीचा शोध घेत असताना गुन्हा घडले ठिकाणी एक मोटारसायकल ही लपवून ठेवलेल्या अवस्थेत मिळून आल्याने सदरच्या मोटारसायकल वरून सदरचा गुन्हा हा इसम नामे १) शुभम सुर्यभान चव्हाण २) शुभम ज्ञानोबा चव्हाण, ३) राम अशोक अडाले व एक अल्पवयीन विधीसंघर्षीत बालक सर्व रा. सावरगाव ता. जामखेड जि. अहिल्यानगर यांनी केला आहे.

अशी खात्रीलायक बातमी मिळाल्याने मा. पोनि श्री दशरथ चौधरी साो. यांनी सदरची माहीती गुन्हे शोध पथकाचे पोना/२०८७ रविंद्र वाघ, पोकॉ/२४२७देविदास पळसे, पोकॉ/ ७५४ कुलदिप घोळवे, पोकॉ/१०१३ आकाश शेवाळे अशांना देवून सदरचे पथकाने तांत्रिक माहीतीच्या आधाराने आरोपी नामे शुभम सुर्यभान चव्हाण व राम अशोक अडाले यांना सोनेगाव ता. जामखेड परिसरातनू ताब्यात घेतले तसेच आरोपी नामे शुभम ज्ञानोबा चव्हाण यास सावरगाव डोंगर परिसरातून ताब्यात घेतले आहे. सदरची कारवाई मा. पोलीस अधिक्षक श्री सोमनाथ घार्गे साो, अहिल्यानगर, मा. अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे साो, अहिल्यानगर, मा. उप विभागीय पोलीस अधिकारी श्री प्रविणचंद्र लोखंडे साो, कर्जत विभाग कर्जत यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. दशरथ चौधरी, पोसई किशोर गावडे, परि पोसई पुष्कर कडू, पोना/२०८७ रविंद्र वाघ, पोकॉ/२४२७ देविदास पळसे, पोकॉ/ ७५४ कुलदिप घोळवे, पोकॉ/१०१३ आकाश शेवाळे, पोकॉ/७५० ज्ञानेश्वर बेल्हेकर, पोकॉ/७४९ भागीरथ देशमाने, पोकॉ/३८९ दत्तु बेलेकर, पोकॉ/२६६३ इश्वर माने, होमगार्ड भारत चव्हाण, संदिप चव्हाण, गणेश गायकवाड, दिंगाबर औचारे तसेच दक्षिण विभाग मोबाईल सेलचे पोकों/ नितीन शिंदे, राहुल गुंडू यांनी केली आहे.

## वसुंधरा अकॅडमी शाळेचा पहिला दिवस उत्साहात संपन्न




अकोले : (स. गांवकरी)

अभिनव शिक्षण संस्था संचलित वसुंधरा अकॅडमीमध्ये आज नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात अत्यंत उत्साहात व आनंदात करण्यात आली. शाळेचा परिसर रंगीबेरंगी फुगे व आकर्षक सजावटींनी सजवण्यात आला होता, ज्यामुळे आनंददायी व उत्सवी वातावरण निर्माण झाले होते. शाळेच्या गेटवर विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. इयत्ता नववीच्या मुलांनी अत्यंत शिस्तबद्ध असेंब्लीचे आयोजन केले. त्यानंतर कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख, उपप्राचार्या राधिका नवले, उपस्थित सर्व पालक, ज्येष्ठ शिक्षक सुनील खताळ वृषाली शेटे, प्राजक्ता नेटके, इंद्रभान कोल्हाळ यांच्या हस्ते सरस्वती पूजनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. इयत्ता दहावीची विद्यार्थिनी अनन्या वनवे घेणे आपले मनोगत व्यक्त केले. प्राचार्या डॉ. जयंश्री देशमुख यांनी सर्व विद्यार्थ्यांचे व पालकांचे उत्साहपूर्वक स्वागत केले नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व सर्व विद्यार्थ्यांना उज्वल व यशस्वी शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा संदेश दिला. इयत्ता पहिलीच्या व प्री स्कूलच्या विद्यार्थ्यांनी केक कापून, नृत्य करतआपला आनंद व्यक्त केला.

## सांस्कृतिक कला महोत्सव "कलादर्पण २०२६"चे आयोजन

वडगाव आनंद : (स. गांवकरी)



आदर्श जि.प .प्राथमिक शाळा, वडगाव आनंद येथे वार्षिक स्नेह संमेलन "कला दर्पण २०२६" उत्साहाच्या व जल्लोषाच्या वातावरणात संपन्न झाले. या वर्षीचा सोहळा विविध संस्कृतींचे दर्शन घडवणाऱ्या कार्यक्रमांची रेलचेल आणि विद्यार्थ्यांच्या विविध गुणदर्शनामुळे अविस्मरणीय ठरला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. सामाजिक कार्यकर्ते डी.बी. वाळुंज यांनी प्रास्ताविक तर छाया डुंबरे यांनी सूत्रसंचालन केले.या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून जी .प .सदस्य मंगेश अण्णा काकडे, माजी पंचायत समिती सदस्य जीवन शिंदे, सरपंच रेलिका जाधव, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष तानाजी देवकर, स्वतंत्र सैनिक. आदि मान्यवर उपस्थित होते ."कलादर्पण २०२६"मध्ये विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्य, नाटक, एकांकिकेच्या कलाविष्काराने सर्वांची मने जिंकली.गरबा, लावणी, आदिवासी नृत्य,रेट्रो, वारी, ऑपरेशन सिंदूर, छावा अशा विविध थीमवर आधारित नृत्याविष्कारांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. गणेश वंदनेने सुरु झालेला कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला. जवळपास २० बक्षिसांचा समावेश असलेल्या लकी ड्रॉ उपक्रमास महिला वर्गाचा मोठा प्रतिसाद मिळाला.

आभाळे या पालकांच्या सहकार्याने सादर केलेल्या "इलेक्ट्रिक कुंपण "या बिबट्यापासून संरक्षणावर आधारित नाटिकेतून जनजागृती करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थी व पालकांसाठी स्नेह भोजनाचे आयोजन करण्यात आले होते. सालाबाद प्रमाणे सहकार्य करणाऱ्यांमध्ये शाहीर गणेश वाघमारे यांनी या कार्यक्रमासाठी मोफत साउंड सिस्टम उपलब्ध करून दिली, तर आदिका लाइट्स यांनी अत्यल्प दरात लाईट, स्क्रीन व डी जे गाडी विजेसाठी व्यवस्था केली. या कार्यक्रमासाठी पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष दत्तात्रय चौगुले पाटील, शिक्षणप्रेमी डी.बी. वाळुंज , शाळेचे मुख्याध्यापक सुनील ठिकेकर , शिक्षक सुनंदा तांबे, गीतांजली वाळुंज व सविता खेत्री यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले. तर या या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने ग्रामस्थ पालक उपस्थित होते त्यात जिल्हा परिषद सदस्य मंगेश अण्णा काकडे, पंचायत समिती सदस्य सपना शिंदे, माझी पंचायत समिती सदस्य जीवन शिंदे ग्रामपंचायत सरपंच रेलिका जाधव, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष तानाजी देवकर ग्रामपंचायत सदस्य संतोष पादिर गोरक्ष देवकर, वैशाली देवकर निशा वाळूज अल्पना देवकर कल्पना पाटील संदीप गडगे ऋषिकेश कडगे सोसायटी चे चेअरमन सचिन वाळुंज सदस्य सुरेश देवकर,स्वातंत्र्य सैनिक राजाराम रहाणे,सामाजिक कार्यकर्ते नवनाथ वाळुंज, निवृत्त शिक्षक तुकाराम वाळुंज व माजी सरपंच सुमनताई वाळुंज, माजी सरपंच एडवोकेट वैशालीताई देवकर एडवोकेट रवींद्र देवकर आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिष्यवृत्तीने आयआयएम मुंबईतील विद्यार्थिनींना नवी दिशा

### STEM शिक्षणासाठी आर्थिक मदत; 1 कोटी स्वप्नांना 'पी अँड जी शिक्षा'चा हातभार

मुंबई : (स. गांवकरी)




प्रॉक्टर अँड गॅम्बल इंडिया (पी अँड जी इंडिया) यांच्या 'पी अँड जी शिक्षा' या प्रमुख सीएसआर उपक्रमांतर्गत आयआयएम मुंबईतील STEM क्षेत्रात शिक्षण घेणाऱ्या तीन विद्यार्थिनींना "बेटियाँ स्कॉलरशिप" देऊन सन्मानित करण्यात आले.


ही शिष्यवृत्ती योजना सेंटर फॉर सिव्हिल सोसायटी यांच्या सहकार्याने राबवली जात असून, वंचित घटकांतील मुलींना उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत आणि मार्गदर्शन दिले जाते. आयआयएम मुंबई इक्वॅलिटी समिटच्या सहाव्या आवृत्तीच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात हा सन्मान प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमाला पी अँड जी इंडियाचे सीईओ वी. कुमार, आयआयएम मुंबईचे संस्थापक संचालक मनोज कुमार तिवारी आणि सेंटर फॉर सिव्हिल सोसायटीचे सीईओ अमित चंद्रा यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

'पी अँड जी शिक्षा' या उपक्रमाने गेल्या 21 वर्षांत देशभरातील 1 कोटीहून अधिक मुलांपर्यंत पोहोचून शिक्षणाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. शिक्षणातील असमानता कमी करून वंचित विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

"शिक्षा बेटियाँ स्कॉलरशिप" ही योजना विशेषतः STEM (विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित) क्षेत्रात शिक्षण घेणाऱ्या मुलींना प्रोत्साहन देण्यासाठी तयार करण्यात आली आहे. यामुळे तरुण महिलांना उद्योगक्षेत्रात आणि नेतृत्वाच्या भूमिकांमध्ये पुढे येण्यासाठी मदत होत आहे. या उपक्रमातून अनेक प्रेरणादायी कथा समोर येत असून हिमाचल प्रदेशातील पलक ठाकूर हिचा प्रवास त्यापैकी एक आहे. आर्थिक अडचणी असूनही तिने 'पी अँड जी शिक्षा'च्या मदतीने आर्टिफिशियल इंटेलिजन्समध्ये शिक्षण घेण्याचा निर्णय घेतला आणि एआय इंजिनिअर बनण्याच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे. या परिषदेत सरकार, उद्योग आणि शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांनी विशेषतः सप्लाय चेन आणि मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रात महिलांचे प्रतिनिधित्व वाढवण्यावर चर्चा केली.

## एरोकोड कंपनीमध्ये समर्थ अभियांत्रिकीच्या ५ विद्यार्थ्यांची निवड




बेल्हे : (स. गांवकरी)

समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट,बेल्हे या अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये एरोकोड प्रा. लि. यांच्या वतीने अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाअंतर्गत "ऑनलाईन कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्ह-२०२६" चे नुकतेच आयोजन करण्यात आल्याची माहिती प्राचार्य डॉ नवनाथ नरवडे यांनी दिली. या प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये कंप्यूटर इंजीनियरिंग आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग इंजिनिअरिंग या शाखेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. एरोकोड कंपनीचे को फाउंडर सागर मेहेर,युवराज हांडे व टेक्निकल पॅनेल चे सीनियर सॉफ्टवेअर इंजिनियर संध्या सिंग गौर, जूनियर सॉफ्टवेअर इंजिनियर तन्मयी सोमवंशी यांनी ऑनलाईन चाचणी व मुलाखती घेतल्या. निवड प्रक्रियेत एकूण ५ विद्यार्थ्यांची निवड झाल्याची माहिती ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी प्रा.सचिन पोखरकर यांनी दिली.या विद्यार्थ्यांना ऐरोकोड कंपनी पुणे येथे ट्रेनी डेव्हलपर म्हणून निवड करण्यात आलेली आहे.

# पारनेर तालुक्यात अवैध धंद्यांचा सुळसुळाट

## दारू, गुटखा, मावा, ताडी जोरात; आतातरी कारवाई होणार का?

पारनेर : (स. गांवकरी)



पारनेर तालुक्यात अवैध धंद्यांचा सुळसुळाट झाला असून, परवानगीशिवाय दारू, गुटखा, मावा, ताडी यांसारख्या प्रतिबंधित पदार्थांची खुलेआम विक्री होत असल्याचे चित्र समोर येत आहे. राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि पोलीस प्रशासनाकडून याकडे हेतूपुरस्सर दुर्लक्ष केले जात असल्याच्या चर्चा परिसरात रंगल्या आहेत. जत्रा, यात्रा आणि सणासुदीच्या काळात हे धंदे पुन्हा नव्या जोमाने सक्रिय झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये आश्चर्य आणि नाराजी व्यक्त केली जात आहे. मागील काही वर्षांत अवैध दारू विक्री लपून-छपून, मागच्या दाराने सुरू होती. मात्र आता ती रस्त्यावर खुलेआम दिसत आहे. इंग्लिश, देशी आणि गावठी दारूची विक्री किंमतीपेक्षा जादा दराने होत असल्याचे ग्रामस्थ सांगतात. सामाजिक कार्यकर्त्यांनी वेळोवेळी पोलिस विभागाला लेखी तक्रारी आणि सूचना दिल्या तरी याकडे गांभीर्याने लक्ष दिले जात नसल्याचे चित्र आहे. यामुळे "या गोरखधंद्यावर वरदहस्त नेमका कुणाचा?" असा सवाल पारनेर तालुक्यातील सामान्य जनतेकडून उपस्थित केला जात आहे. तालुक्यातील अनेक रस्त्यालगतच्या टपऱ्यांवर शासनाची कोणतीही परवानगी नसताना नामवंत कंपन्यांचा गुटखा, मावा आणि राजे यांची विक्री खुलेआम सुरू आहे. स्थानिक पोलीस विभागाकडून यावर कोणतीही कारवाई होताना दिसत नाही. यामध्ये कुठला ना कुठला अर्थपूर्ण संबंध असण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे. रस्त्यालगत असलेल्या या टपऱ्यांवर कारवाई होणार का, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

पारनेर तालुक्यातील बहुतेक दारू दुकाने हायवे टच (रस्त्यालगत) असून काही दुकाने लोकवस्तीमध्येही आहेत. हे सर्व स्थानिकांना माहीत असताना पोलिस विभागाला मात्र हे कसे माहीत नाही, असा देखील उपहासात्मक सवाल निर्माण झाला आहे. ग्रामस्थांचा आरोप आहे की, "फक्त आम्हाला दिसते, पोलिसांना मात्र दिसत नाही." आता तरी पोलिस या अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करतील का, असा प्रश्न स्थानिकांकडून विचारला जात आहे.

स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्ते यांनी सांगितले की, "अवैध धंदे फक्त पैशासाठी चालवले जात आहेत. यामुळे युवक आणि कुटुंबे बरबाद होत आहेत. पोलीस आणि उत्पादन शुल्क विभागाने आता सक्रिय होऊन या धंद्यांवर कठोर कारवाई करावी." काही ठिकाणी पोलीस विभागाने गावठी दारूच्या हातभट्ट्यांवर छापे टाकून कारवाई केल्याच्या घटना समोर आल्या आहेत, मात्र व्यापक स्तरावर नियंत्रण नसल्याचे चित्र आहे.

पारनेर तालुक्यातील या अवैध धंद्यांच्या मुद्द्याकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. अन्यथा सामान्य जनतेचा विश्वास उडण्याची शक्यता आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे तातडीने लक्ष देऊन परिस्थिती नियंत्रणात आणावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### दारूबंदी ठराव असतानाही विक्री

तालुक्यातील बऱ्याच ग्रामपंचायतींनी वेळोवेळी दारूबंदीचे ठराव पास केले आहेत. मात्र ज्या गावांमध्ये दारूबंदीचा ठराव आहे, त्या ठिकाणीच सर्वाधिक दारू विक्री होत असल्याचे चित्र आहे. रोडवरही ही विक्री सुरू असून, यावर कोणत्याही अधिकाऱ्याला अंकुश ठेवता आलेला नाही. यामुळे सर्वसामान्य नागरिकांची खंत वाढली आहे. महिलांसह सामाजिक संघटनांकडून वारंवार दारूबंदीची मागणी केली जाते, तरीही प्रत्यक्षात अंमलबजावणी होत नसल्याचे दिसते.

# निघोजचे मंदार चौधरी यांना डॉक्टरेट पदवी

पारनेर : (स. गांवकरी)


शिक्षण व सामाजिक क्षेत्रात विशेष आवड असणाऱ्या मंदार हिरेश चौधरी यांनी नुकतीच पी एच डी करून डॉक्टरेट पदवी मिळवली आहे. मंदार चौधरी हे निघोजचे असून सध्या ते मुंबई येथे स्थायीक झाले आहेत. जी एस महानगर बँकेचे माजी संचालक विष्णू दादा चौधरी यांचे ते नातू असून मुंबई येथे सामाजिक कार्यात सक्रिय असणारे हिरेश चौधरी यांचे ते चिरंजीव आहेत.मंदार यांचा Global rise of far right and far left in 21st Century:



Investigating the Emerging Populist Political Culture हा त्याचा पीएचडीचा विषय होता .

मंदार एकाच वेळी इंजिनियर - प्राध्यापक -वकील व डॉक्टर आहे .BE ,LLB ,MA POLITICAL SCIENCE,MA ECONOMICS AND PHD ई त्याच्या पदव्या आहेत . L and T कंपनीत उच्च पदावर व उत्तम पगार मिळत असतानाही तो सोडून मंदार विद्यार्थी घडविण्याचे पुण्याईचे काम करीत आहे . काही कॉलेज व मुंबई विद्यापीठात शिकवत असताना ते युपीएससीच्या विद्यार्थ्यांनाही शिकवीत आहेत ही बाब उल्लेखनीय आहे. सध्या ते विद्यालंकार कॉलेज मुंबई मध्ये प्राध्यापक आहेत . सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबवीत कॉलेजच्या विद्यार्थ्यांना ते पाठबळ देत आहेत. जागतिक नोटा नाणी सँम्प सह दुर्मिळ प्रदर्शन . त्यांच्या एकांकिकेला अनेक बक्षिसे मिळाली आहेत . मराठी भाषा दिन ,पुस्तक दिंडी ' पथ नाट्ये . अनेक मान्यवरांची व्याख्याने अशाप्रकारची कार्यक्रमांचे आयोजन करुण शैक्षणिक संस्कृतीला प्रोत्साहन देण्याचे काम ते सातत्याने करीत आहेत. मुंबई आणी उपनगर शहरात सामाजिक संस्था, महाविद्यालय या ठिकाणी त्यांचे व्याख्यानाचे आयोजन करण्यामध्ये संस्था सातत्याने कार्यरत असतात.

भविष्यात अवयवदान देहदान जागरुकता ई विषय विद्यार्थ्यांसाठी आणणार . ट्रेकिंग . लेखन , पर्यावरण ' समुपदेशन ई वेगळ्या विषयांत त्यांना रुची आहे . निघोज आणी परिसरातील स्पर्धा परीक्षा देणाऱ्या तसेच युपीएससी परीक्षा विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शन करण्याचा त्यांचा संकल्प असून मराठी भाषीक विद्यार्थी मोठ्या संख्येने युपीएससी परीक्षेत उत्तीर्ण होऊन केंद्र व राज्य सरकारच्या सेवेत दाखल होऊन राज्याचा नावलौकिक देशात होण्यासाठी ते प्रयत्नशील आहेत.



**एकदरे/प्रतिनिधी(बाजीराव भांगरे ) :** अकोले तालुक्यातील जायनावाडी येथे महाकाळच्या डोंगरावर विंड ओल्ड इंडिया कंपनीच्या कर्मच्यार्‍यांनी भैरवनाथ मंदिराजवळ एकदिवशीय रास्ता रोको आंदोलन केले.आमच्या बदल्या करू नका बदली केली तर आमच्या सुरक्षेची जबाबदारी कंपनी घेईल का,आम्ही आमचे कुटुंब कसे चालवणार आम्ही सर्व कर्मचारी शेती करून पोट पाणी भरतो त्यात आमचे स्थलांतर करू नका या भूमिका घेऊन भैरवनाथ मंदिराजवळ उन्हातान्हात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

## थोडक्यात बातम्या...



### कालव्यात वाहून गेलेल्या दाम्पत्याचे ४० तासांनंतर मृतदेह सापडले

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : येडगाव धरणाच्या कुकडी डाव्या कालव्यात पडून उंब्रज येथील अक्षय यशवंत शिंगोटे वय वर्षे २८ व प्राजक्ता अक्षय शिंगोटे वय वर्षे २५ या पती पत्नीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना सोमवार दि:-३० मार्च रोजी सायंकाळी ५:३० सुमारास घडली त्यानंतर साधारणतः ४० तासांच्या तपासानंतर बुधवार दि:-१ एप्रिल स: १० वाजण्या च्या सुमारास लेंडेस्थळ येथे दोन्ही नवरा बायकोचे मृतदेह सापडले. यावेळी मिळालेल्या माहिती नुसार,सोमवार सायंकाळी काही नागरिक काळवाडीच्या दिशेने कालव्याच्या रस्त्याने जात होते त्यांना कालव्याच्या कडेला एक लहान बाळ रडत आपल्या आई वडिलांना हाका मारताना दिसले संशय आल्याने वाटसरूंनी त्या ठिकाणी पाहणी केली असता चप्पल दिसून आली.त्याचवेळी कालव्यात लक्ष दिल्यावर संबंधित दाम्पत्य पाण्याच्या प्रवाहात वाहून जाताना दिसले या घटनेची माहिती तत्काळ आळेफाटा पोलीसांना देण्यात आली. पोलीस निरीक्षक विश्वास जाधव व त्यांच्या पथकाने घटना स्थळी धाव घेत शोधमोहीम सुरू केली.श्रीगोंदा तालुक्यातील विसापूरपर्यंत शोध घेण्यात आला मात्र यश आले नाही. पाण्याचा वेग प्रचंड असल्याने शोध घेण्यात अडथळे येत होते. दरम्यान,उंब्रज व काळवाडी येथील ग्रामस्थ,सरपंच हिरामण हांडे,तुषार वामन तसेच पोलीस पाटील राहुल हांडे यांनी पाट बंधारे विभागाकडे कालव्याचे पाणी कमी करण्याची मागणी केली.सुरुवातीला अधिकाऱ्यांनी असमर्थता दर्शविल्याने ग्रामस्थ व अधिकाऱ्यांमध्ये शाब्दिक चकमक झाली.अखेर ग्रामस्थ आक्रमक झाल्यानंतर बुधवारी सकाळी पाणी बंद करण्यात आले.यानंतर जुन्नर येथील शिवनेरी रेस्क्यू टीमच्या १० सदस्यांच्या मदतीने पुन्हा शोध मोहीम राबविण्यात आली. घटनास्थळापासून सुमारे दोन किलोमीटर अंतरावर लेंडेस्थळ येथे दोघांचे मृतदेह सापडले. यावेळी पोलीस निरीक्षक विश्वास जाधव,आळेफाटा पोलीस स्टेशनचे कर्मचारी व पोलीस पाटील राहुल हांडे यांनी पंचनामा केला असून पुढील तपास आळेफाटा पोलीस करत आहेत.



### सह्याद्रि हॉस्पिटलमध्ये गुडघेदुखीवर शस्त्रक्रियामुक्त नवी उपचारपद्धती सुरू

पुणे (स. गांवकरी) : मणिपाल समूहाच्या रुग्णालय जाळ्यातील Sahyadri Hospitals यांनी राज्यात पहिल्यांदाच गुडघेदुखीवर शस्त्रक्रियेशिवाय ‘लो-डोस रेडिओथेरपी’ ही आधुनिक उपचारपद्धती सुरू केली आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिकांसाठी ही उपचारपद्धती आशादायक ठरत असून, सांधेदुखीवर जलद आणि प्रभावी आराम मिळत आहे. वाढत्या वयानुसार होणाऱ्या ऑस्टिओआर्थ्रायटीसमुळे अनेकांना सांधेदुखीचा त्रास सहन करावा लागतो. या आजारामुळे हालचालींवर मर्यादा येऊन जीवनमानावर परिणाम होतो. अशा रुग्णांसाठी ही नवीन उपचारपद्धती सुरक्षित, वेदनारहित आणि शस्त्रक्रियामुक्त पर्याय म्हणून पुढे आली आहे. कमी वेळात पूर्ण होणाऱ्या सत्रांमुळे रुग्णाला रुग्णालयात दाखल होण्याची आवश्यकता नसून, उपचारानंतर लगेचच दैनंदिन कामे करता येतात. मणिपाल हॉस्पिटल्सचे प्रादेशिक संचालक (पश्चिम) Sagir Siddiqui यांनी सांगितले की, “नवीन तंत्रज्ञानाच्या मदतीने आम्ही रुग्णांना वेदनामुक्त आणि सुरक्षित उपचार देण्यास कटिबद्ध आहोत.” हडपसर येथील ७२ वर्षीय महिलेला या उपचाराद्वारे यशस्वी दिलासा मिळाला. सहा सत्रांनंतर त्यांच्या वेदनांमध्ये लक्षणीय घट झाली असून, चालण्यातील अडचणी कमी झाल्या आहेत. रेडिएशन ऑन्कोलॉजी विभागाचे संचालक Dr. Sanjay Hunugundamath यांनी सांगितले की, “ही उपचारपद्धती सांध्यातील सूज कमी करण्यात प्रभावी असून, शस्त्रक्रिया शक्य नसलेल्या रुग्णांसाठी उत्तम पर्याय ठरते.” रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टरांच्या संयुक्त सल्ल्यानुसार ही उपचारपद्धती राबवली जात असून, रुग्णांच्या जीवनमानात सुधारणा घडवण्यास मदत होत आहे.

### मढेवडगावच्या मातीचा सुगंध जपणाऱ्या स्वप्नाला यशाची भरारी

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : मढेवडगावच्या मातीतून उगम पावलेले एक स्वप्न आज अभिमानाने फुलले आहे. सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे श्री सुभाष काका शिंदे यांच्या कुटुंबातील संस्कार, कष्ट आणि प्रामाणिकतेची परंपरा पुढे नेणारे त्यांचे पुतणे, विधीतज्ञ ॲड. जयंतराव बापूराव शिंदे यांची श्रीगोंदा बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे. ही निवड केवळ पदाची प्राप्ती नसून त्यांच्या दीर्घ प्रवासाची, संघर्षाची आणि जिद्दीची जिवंत साक्ष मानली जात आहे.

# भगवान महावीर यांच्या जयजयकाराने जामखेड दुमदुमले

## सकल जैन समाजाच्यावतीने शहरात पारंपरिक मिरवणूक



मिरवणुकीदरम्यान जैन बांधवांसाठी पिण्याच्या पाण्याची व शीतपेयांची व्यवस्था करण्यात आली होती. शहरच्या पदाधिकाऱ्यांनी ही सोय केली. तसेच जैन श्रावक संघाच्या वतीने वर्षभरात विविध सामाजिक कार्यक्रम राबविले जातात. चार महिने चातुर्मास, पाठशाळा, मुलांवर संस्कार शिबिरांचे आयोजन, व्यसनमुक्तीसाठी प्रयत्न, अनाथ मुलांना शैक्षणिक मदत, विहारमधील महाराजांचे प्रवचन, शांतीराज निवास येथे विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम आणि गोरगरीब विद्यार्थ्यांना आर्थिक व शैक्षणिक मदत संघाकडून करण्यात येते. **- दिलीप गुगळे, अध्यक्ष, जैन श्रावक संघ**

- भगवान महावीर जयंती मोठ्या उत्साहात
- जल्लोषात पारंपरिक पद्धतीने संपन्न.

जामखेड तालुका : (स. गांवकरी)

अहिंसा, सत्य, अपरिग्रह आणि 'जगा व जगू द्या'चा संदेश देत मानवतेचा मार्ग उजळून टाकणारे जैन धर्माचे २४वे तीर्थंकर भगवान महावीर यांची जयंती आज मंगळवारी दि. ३१ मार्च २०२६ रोजी जामखेड शहरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. 'प्रेम से बोलो, जय महावीर च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला होता. वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ व सकल जैन समाजाच्या वतीने जयंतीनिमित्त शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

सकाळी ८ वाजता भगवान महावीर यांच्या प्रतिमेची पारंपरिक मिरवणूक काढण्यात आली. बीड रोड, छत्रपती चौक, जयहिंद चौक आणि छत्रपती शिवाजी महाराज पेठ मार्गे निघालेल्या या मिरवणुकीची सांगता जैन स्थानक येथे झाली.

मार्गावर ठिकठिकाणी भाविकांनी या मिरवणुकीचे उत्स्फूर्त स्वागत करत जयघोष केला. या कार्यक्रमाला वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, पदाधिकारी, संचालक मंडळ, ट्रस्टी आणि श्रावक-श्राविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बडवायझरने पहिल्या भागीदारीची केली घोषणा

मुंबई : (स. गांवकरी)

बडवायझर 0.0 ने आज भारतातील सर्वात मोठ्या टी20 क्रिकेट लीगमधील अग्रगण्य फ्रँचायझी मुंबई इंडियन्ससोबत भागीदारीची घोषणा केली. ही भागीदारी बडवायझर 0.0 चा 19व्या सीझनमधील पहिला प्रवेश असून, भारतातील क्रिकेट प्रवासातला एक महत्त्वाचा टप्पा आहे. या सहयोगातून बडवायझर 0.0 मुंबईतील चाहत्यांशी जोडणार आहे, स्थानिक क्रिकेट संस्कृतीतील अभिमान, परंपरा आणि मॅच-डे रिवाज साजरे करणार आहे. जगातील सर्वात मोठ्या स्पोर्टिंग प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या या लीगमुळे चाहत्यांशी नातं अधिक घट्ट करण्याची संधी मिळणार आहे. घोषणेवर प्रतिक्रिया देताना एबी इनबेव इंडिया चे व्हाइस प्रेसिडेंट, मार्केटिंग & ट्रेड मार्केटिंग, विनीत शर्मा म्हणाले “क्रिकेट हा भारतातील




सर्वात प्रभावी सांस्कृतिक कनेक्टर आहे आणि आमची आयसीसी पुरुष टी20 वर्ल्ड कप 2026 मधील पहिली भागीदारी चाहत्यांच्या उत्कटतेचं पुन्हा एकदा दर्शन घडवते. बडवायझर 0.0 मध्ये आम्ही स्वतःला संस्कृतीच्या अग्रभागी मानतो – फॅन एक्सप्रेशनला नवे ट्रेंड देतो, तरुण भारत खेळाशी कसा जोडतो हे ठरवतो आणि आजच्या काळात तो कसा दिसतो याचा टोन सेट करतो.

# हनुमान जन्मोत्सव निमित्ताने कार्यक्रमांचे आयोजन



पारनेर : (स. गांवकरी)

निघोज येथे दरवर्षीप्रमाणे गुरुवार दि.२ एप्रिल रोजी हनुमान जन्मोत्सव निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सामुदायिक हनुमान चालीसा पठण, कोमल संगीत रजनी तसेच गुरुवारी पहाटे मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे कोषाध्यक्ष रामदासशेठ वरखडे, कपिलेश्वर उद्योग समूहाचे अध्यक्ष सोमनाथ महाराज वरखडे, उद्योजक लहूशेठ गागरे , पोपट महाराज देशपांडे, राजेंद्र उनवणे, विलासराव हारदे,मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त संतोषशेठ रसाळ , संदीप पाटील उद्योग समूहाचे अध्यक्ष आप्पासाहेब वराळ पाटील, माजी ग्रामपंचायत सदस्य भगवान भालेकर,भगवान श्रीमंदिलकर यांच्या हस्ते अभिषेक त्यानंतर तुषार महाराज गुंड यांचे किर्तन तसेच कै. सुमनबाई निवृत्ती उनवणे यांच्या स्मरणार्थ उनवणे परिवार तसेच ठेकेदार संतोषशेठ दुतारे, हर्षद ईधाटे, संतश्रेष्ठ रामदास बाबा दुसाणे दिंडी सोहळ्याचे संस्थापक अध्यक्ष भाऊसाहेब कोल्हे मामा यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचा भावीकांनी लाभ घ्यावा असे आवाहन निघोज ग्रामस्थ व पवनपुत्र हनुमान मंडळ निघोज यांनी केले आहे.

# सेवानिवृत्त शिक्षकांचा भावपूर्ण गौरव

टाकळी ढोकेश्वर : (स. गांवकरी)




अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संचालित श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, टाकळी ढोकेश्वर येथे संस्थेच्या प्रदीर्घ सेवेतून सेवानिवृत्त होणाऱ्या दोन ज्येष्ठ शिक्षकांचा सेवापूर्ती गौरव समारंभ बुधवार, दि. १ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९ वाजता विद्यालयाच्या प्रांगणात मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला.

विद्यालयाचे सन्माननीय सेवक मा. प्रा. विजय दत्तात्रय सोबले व मा. श्री. मल्हारी केरु वाघस्कर (सर) हे ३१ मे २०२६ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या दीर्घकालीन समर्पित सेवेचा गौरव करण्यासाठी हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला संस्थेच्या उच्च पदाधिकाऱ्यांनी उपस्थिती दर्शवली.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या खजिनदार मा. ॲड. दिपलक्ष्मी संभाजीराव म्हसे मॅडम यांनी भूषवले. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष मा. डॉ. विवेक प्रभाकर भापकर साहेब उपस्थित होते. सन्माननीय उपस्थितीमध्ये संस्थेचे सचिव विश्वासराव आठरे पाटील, मा. सिताराम विठ्ठलराव खिलारी साहेब, गव्हर्निंग कौन्सिल सदस्य डॉ. भाऊसाहेब सिताराम खिलारी साहेब, सहसचिव मा. मुकेश माधवराव मुळे साहेब बाबासाहेब खिलारी,शिवाजी खिलारी,विलास झावरे,उपसरपंच किरण तराळ , दत्तात्रय निवडुंडे,पत्रकार शरद झावरे,मोहन रोकडे,यांच्यासह सर्व कार्यकारीणी व जनरल बॉडी सदस्य परिसरातील ग्रामस्थ,आजी/माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोनल रोहोकले,अतुल सैद,बाबासाहेब जाधव यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. स्वागतोत्सुक म्हणून पर्यवेक्षक श्रीमती मनिषा आबासाहेब गाडगे व शास्त्र समन्वयक मा. अशोक दशरथ गांगड यांनी अतिथींचे स्वागत केले. शिक्षिका प्रतिनिधी श्रीमती खिलारी निलम दगडु व शिक्षक प्रतिनिधी श्री. जाधव बाबासाहेब बाळासाहेब यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

कार्यक्रमास श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, सेवकवृंद, सर्व विद्यार्थी, श्री ढोकेश्वर वस्तीगृहाचे अधिक्षक व सेवकवृंद, शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, पालक, पत्रकार व टाकळी ढोकेश्वर परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात सेवानिवृत्त शिक्षकांना स्मृतिचिन्ह, शाल, पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या सेवेची आठवण सांगितली आणि भावी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. सर्वांनी एकत्रितपणे सेवानिवृत्त शिक्षकांना निरोप देताना भावनिक क्षण अनुभवले.

प्रा. विजय दत्तात्रय सोबले व श्री. मल्हारी केरु वाघस्कर सर यांनी विद्यालयात अनेक वर्षे शिकवणूक, शैक्षणिक विकास व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या सेवेमुळे असंख्य विद्यार्थ्यांना चांगले संस्कार झाले. सेवानिवृत्तीच्या निमित्ताने त्यांचा सत्कार करून संस्थेने त्यांच्या कार्याचा गौरव केला.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज (स्थापना १९१८) हा जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रातील अग्रेसर संस्था आहे. संस्था जिल्हाभरात माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, महाविद्यालये चालवते आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देते.

# प्रकाश राठोड यांना 'राज्यस्तरीय आदर्श सरपंच सन्मान' जाहीर



हा पुरस्कार केवळ माझा सन्मान नसून, पळशी ग्रामपंचायतीच्या प्रत्येक सदस्याचा आणि ग्रामस्थांचा माझ्यावर असलेल्या विश्वासाचा विजय आहे. 'स्वराज्य सरपंच सेवा संघा'ने माझ्या कार्याची दखल घेतली, याचा मला सार्थ अभिमान आहे. आदर्श गाव घडवण्याचे आमचे ध्येय असून, यापुढील काळातही लोकसहभागातून पळशीचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आणि समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या योजना पोहोचवण्यासाठी मी कटीबद्ध राहीन.

**- प्रकाश राठोड (सरपंच, पळशी)**

## कामाची पोचपावती

प्रकाश राठोड यांनी सरपंच म्हणून पळशी गावामध्ये राबवलेले विविध विकास प्रकल्प, प्रशासकीय पारदर्शकता आणि जनसामान्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी घेतलेले परिश्रम यामुळे त्यांची ही निवड सार्थ ठरली असल्याचे आयोजकांनी नमूद केले आहे. सरपंच सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष रोहित पवार यांनी या निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन केले आहे.

पारनेर : (स. गांवकरी)

स्वराज्य सरपंच सेवा संघ, महाराष्ट्र प्रदेश यांच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठित 'राज्यस्तरीय आदर्श सरपंच सन्मान २०२६' पारनेर तालुक्यातील पळशी ग्रामपंचायतीचे लोकनियुक्त सरपंच मा. श्री. प्रकाश बबन राठोड यांना जाहीर झाला आहे. ग्रामीण विकासातील उल्लेखनीय कामगिरी आणि समाजहितासाठी दिलेल्या योगदानाची दखल घेत त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. येत्या रविवार, ५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता, सावेडी रोडवरील माऊली संकुल सभागृह , अहिल्यानगर येथे हा भव्य राज्यस्तरीय सन्मान सोहळा संपन्न होणार आहे. 'मान कर्तृत्वाचा.. सन्मान नेतृत्वाचा' या ब्रीदवाक्याखाली आयोजित या कार्यक्रमात राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक दिग्गज उपस्थित राहणार आहेत.

हा पुरस्कार सोहळा सरपंच सेवा संघाचे मार्गदर्शक बाबासाहेब पावसे पाटील यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाला शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आदर्श सरपंच भास्करराव पेरे पाटील, ग्रामसेवक नेते एकनाथराव ढाकणे, तसेच रोहित पवार आणि यादवराव पावसे पाटील यांसारख्या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. आदर्श सरपंच पुरस्कार जाहीर झाल्यानंतर नगर दक्षिणचे खासदार निलेश लंके यांनी सरपंच प्रकाश राठोड यांचे अभिनंदन केले आहे.

या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी पळशी ग्रामस्थ आणि मित्रपरिवाराने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सरपंच सेवा संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

## थोडक्यात पण महत्वाचे



### डांग जिल्ह्यातील १७५ गावांत हनुमान जयंतीचे भव्य आयोजन

डांग : गुजरात (स. गांवकरी) : हनुमान जयंती निमित्त डांग जिल्ह्यात मोठ्या उत्साहात धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सुमारे १७५ गावांमध्ये भजन, भंडारा तसेच हनुमान चालीसाचा गजर होणार आहे. दंडकारण्याच्या पावन भूमीवर जिल्ह्यातील सर्व ३११ गावांमध्ये श्री हनुमान मंदिर उभारण्याचा संकल्प एस.आर.के. ग्रुप, सुरतचे गोविंदभाई धोळकिया तसेच प्रेरणामूर्ती प्रयोषा प्रतिष्ठान, डांगचे पूज्य पी.पी. स्वामीजी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे. आदिवासी बांधवांच्या जीवनात सामाजिक जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने 'डांग प्रयाग, हनुमान याग' हा उपक्रम सुरू करण्यात आला असून, आतापर्यंत १७५ नव्याने बांधलेल्या हनुमान मंदिरांचे लोकार्पण पार पडले आहे. या मंदिरनिर्माणामुळे ग्रामस्थांमध्ये भक्तिभाव वाढताना दिसत आहे. हनुमान जयंतीनिमित्त विविध गावांमध्ये भक्तिमय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. आहवा तालुक्यातील मोठा चर्या व जाखाना गावांमध्ये चार दिवसांचा विशेष कार्यक्रम सुरू आहे. १४ गावांत १०८ हनुमान चालीसाचे पठण, ४२ गावांत ५४ वेळा चालीसा, तर ९१ गावांत तीन दिवस दररोज ३६ वेळा चालीसा पठण केले जाणार आहे. ३० गावांत सात वेळा चालीसा पठण होणार असून, २२ गावांत पालखी सोहळा काढण्यात येणार आहे. याशिवाय १७० गावांत भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात के.डी. नारोला, महेशभाई करगर यांसारखे दाते सहभागी होणार आहेत. पूज्य पी.पी. स्वामीजी दिवसभर विविध कार्यक्रमांना उपस्थित राहून भाविकांना मार्गदर्शन करणार आहेत. समन्वयक प्रभुभाई धोळकिया यांनी सर्व रामभक्तांना हनुमान जयंतीच्या शुभेच्छा देत या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

### सापुतारा-हाथगड बॉर्डर परिसरात प्रवाशांशी उद्धट वागणूक

सापुतारा (स. गांवकरी) : हाथगड सीमा परिसरात महाराष्ट्र पोलिसांकडून वाहनचालकांशी उद्धट वागणूक दिल्याचे कथित व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आहेत. गुजरात–महाराष्ट्र सीमेवरील हाथगड परिसरात वाहनांची वारंवार तपासणी, अडवणूक आणि अनावश्यक चौकशी केली जात असल्याचा प्रवाशांचा आरोप आहे. काही ठिकाणी पोलिसांकडून उद्धट भाषेचा वापर करून दबाव टाकला जात असल्याचेही नागरिकांनी म्हटले आहे. दररोज या मार्गाने प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना विनाकारण थांबवले जात असल्याने प्रवाशांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओंमुळे हा विषय अधिकच गंभीर बनला असून अनेक नागरिकांनी महाराष्ट्र पोलीस विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रारी नोंदवण्यास सुरुवात केली आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित पोलिसांवर चौकशी करून कडक कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. तसेच प्रशासनाने या प्रकाराची गांभीर्याने दखल घेऊन प्रवाशांना विनाकारण त्रास होणार नाही याची खात्री करावी आणि पोलिसांनी जनतेशी नम्र व कायदेशीर पद्धतीने वागावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

### वारे, गारपीट अन् मुसळधार; हवामान विभागाचा धडकी भरवणारा इशारा

अहिल्यानगर (स. गांवकरी) : राज्यावर अवकाळी पावसाचे संकट ओढावले आहे. राज्याच्या विविध भागात पावसाने हजेरी लावली आहे. पुण्यासह राज्याच्या काही भागात वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस पडला आहे. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. अशातच आता हवामान विभागाच्या अंदाजाने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. हवामान विभागाच्या अधिकाऱ्यांनी मराठवाडा आणि विदर्भातील काही भागात वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे.

# नामसप्ताहाची काल्याच्या किर्तनाने सांगता

नेवासा : (स. गांवकरी)

नेवासा तालुक्यातील जागृत असलेल्या श्री क्षेत्र बहिरवाडी येथील श्री कालभैरवनाथांच्या यात्रेनिमित्त आयोजित त्रिदिनात्मक नामसप्ताह व पारायण सोहळयाची बुधवारी दि.१ एप्रिल रोजी देवगड संस्थानचे प्रमुख महंत राष्ट्रसंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने सांगता करण्यात आली.दुष्ट प्रवृत्ती वाढते तेव्हा त्याच्या उच्चाटनासाठी भगवान शिवाचे अवतार असलेले श्री कालभैरवनाथ हे अवतार रूपाने कार्य करत असल्याने त्यांची उपासना नित्यनेमाने करा असा संदेश गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांनी उपस्थित हजारो भाविकांसमोर बोलतांना दिला बुधवार दि.१ एप्रिल रोजी श्री कालभैरवनाथांची मुख्य यात्रा असल्याने सकाळी ८ वाजता गंगेवरून आणलेल्या कावडीच्या




पाण्याने श्री कालभैरवनाथांना जलाभिषेक घालण्यात आला. यात्रेनिमित्त देवगड येथील महंत राष्ट्रसंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज व मध्यमेश्वर देवस्थानचे प्रमुख महंत बालयोगी ऋषिनाथजी महाराज यांनी श्री कालभैरवनाथांच्या मूर्तीचे पूजन करून दर्शन घेतले. यावेळी भजने गात टाळ मृदुंगाच्या गजरात गुरुवर्य भास्करगिरीजी बाबांचे स्वागत करण्यात आले यावेळी झालेल्या काल्याच्या किर्तनात बोलताना गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज म्हणाले की श्री बहिरवाडी येथील श्री कालभैरवनाथ हे जागृत दैवत आहे दुष्ट प्रवृत्ती वाढते तेव्हा अवतार रूपाने त्या प्रवृत्तीचा संहार करण्यासाठी श्री कालभैरवनाथ हे कार्य करत असतात,श्री कालभैरवनाथांच्या केलेल्या भक्तीमुळे येथील परिसराचा कायापालट झालेला दिसत आहे,अनेक विकासकामे मार्गी लावण्यात यश आलेले आहे,या भागातील युवा संत मंडळी देखील चांगले कार्य करत आहे याबद्दल समाधान व्यक्त करून त्यांनी येथील पारमार्थिक कार्य तेवत ठेवा,नियम व शिस्तीद्वारे देवस्थानचे धार्मिक वैभव टिकवून ठेवा असे आवाहन यावेळी बोलतांना केले. यावेळी झालेल्या काल्याच्या किर्तन प्रसंगी आमदार विठ्ठलराव लंघे पाटील उपस्थित होते. बहिरवाडीकडे येणाऱ्या रस्त्याच्या कामांना खडीकरणाने सुरुवात करण्यात आल्याने गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबांच्या हस्ते आमदार विठ्ठलराव लंघे यांचा सन्मान करण्यात आला.उपस्थित संत मंडळींसह त्रिदिनात्मक सोहळयात योगदान देणाऱ्या दात्यांचा श्री कालभैरवनाथ देवस्थानच्या वतीने सन्मान करण्यात आला.

यावेळी झालेल्या काल्याच्या किर्तन प्रसंगी त्रिदिनात्मक सोहळयात योगदान देणाऱ्या दात्यांचा गुरुवर्य श्री भास्करगिरी बाबांच्या हस्ते सन्मान करण्यात आला यावेळी देवगडचे सेवेकरी बाळू महाराज कानडे,तात्या महाराज शिंदे, नारायण महाराज ससे,रामनाथ महाराज पवार,लक्ष्मण महाराज नांगरे,विजय महाराज पवार,शुभम महाराज बनकर,गणेश महाराज तनपुरे,उमेश महाराज, रोहित महाराज पटारे, सोमनाथ महाराज पानकडे यांच्यासह श्री कालभैरवनाथ पब्लिक स्ट्रस्टचे अध्यक्ष व विश्वस्त समस्त ग्रामस्थ,श्री कालभैरवनाथ युवा मंच,श्री कालभैरव तरुण मंडळ श्री कालभैरवनाथ यात्रा समितीचे पपदाधिकारी पंचक्रोशीतील हजारो भाविक उपस्थित होते.उपस्थित हजारो भाविकांना दाळ रोडग्याच्या महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## सायबर भामट्यांनी अभियंत्याला लुटले

**दारूसाठी पैसे न दिल्याने तरुणावर हल्ला**

अहिल्यानगर : (स. गांवकरी)


चुकीच्या क्रमांकावर गेलेले ६०० रुपये परत मिळवण्याच्या प्रयत्नात असलेल्या एका तरुण अभियंत्याला सायबर चोरट्यांनी तब्बल ४० हजार रुपयांना लुटल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नालेगाव परिसरातील रहिवासी आदित्य संजय बेल्हेकर या तरुणाकडून पैसे पाठवताना मोबाईल क्रमांक चुकला होता. त्यामुळे त्याचे ६०० रुपये हरिलाल नावाच्या व्यक्तीच्या खात्यात जमा झाले. हे पैसे परत मिळवण्यासाठी आदित्यने इंटरनेटवरून 'एनपीसीआई' कस्टमर केअरचा क्रमांक शोधला. चोरट्यांनी बनावट क्रमांकाद्वारे आदित्यशी संपर्क साधून त्याचा विश्वास संपादन केला.

बँकेचा आयएफसी कोड आणि इतर तांत्रिक माहिती घेतल्यावर, चोरट्यांनी आदित्यच्या खात्यातून ३९ ,९८९ रुपये परस्पर दुसऱ्या खात्यात वळवले. ही रक्कम गया येथील नितीश कुमार नावाच्या व्यक्तीच्या खात्यात जमा झाल्याचे तपासात समोर आले आहे. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच आदित्यने पोलिसांत धाव घेतली. या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी संशयित आरोपीच्या भ्रमणध्वनी क्रमांकावर गुन्हा नोंदवला असून अधिक तपास सुरू आहे. नागरिकांनी अनोळखी क्रमांकावर आपली गोपनीय माहिती देऊ नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## जागतिक पातळीवरील न्युरो-आँकोलॉजी तज्ञ एकाच मंचावर

पुणे (स. गांवकरी)

रूबी हॉल क्लिनिक येथे ईसनोकॉन २०२६ या इंडियन सोसायटी ऑफ न्युरो आँकोलॉजीच्या वार्षिक परिषदेचे २ ते ५ एप्रिल २०२६ दरम्यान आयोजन करण्यात आले आहे.जागतिक पातळीवरच्या १७ व्या अशा प्रकारची ओळख असलेल्या या परिषदेमध्ये न्युरो आँकोलॉजी विषयातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय तज्ञ एकत्र येणार असून मेंदू आणि मणक्याच्या गाठींवरील उपचारांच्या बाबतीत पुणे शहर जागतिक नकाशावर ठळकपणे अधोरेखित होईल. या परिषदेचे उद्‌घाटन बजाज फिनसर्व्ह सीएसआरच्या अध्यक्ष शेफाली बजाज यांसह डॉ.परवेझ ग्रांट,डॉ.सिमोन ग्रांट,नताली ग्रांट नंदा,उत्कर्ष भोटे व रूबी हॉल क्लिनिक आँकोलॉजी विभागातील तज्ञ डॉ.भूषण झाडे,डॉ.मानसी मुन्शी गिरमे आणि डॉ.नीरज धिंग्रा यांच्या उपस्थितीत होईल. बहुशाखीय व्यासपीठ म्हणून डिझाईन केलेले ईसनोकॉन २०२६ न्युरो सर्जन ,न्युरोलॉजिस्ट,रेडिएशन



व मेडिकल आँकोलॉजिस्ट,न्युरो पॅथोलॉजिस्ट आणि रेडिओलॉजिस्ट यांना एकत्र आणेल. ही परिषद निवासी डॉक्टर्स,शिकाऊ डॉक्टर्स, नवे स्पेशालिस्ट यांच्यासाठी उपयुक्त असून रूग्ण प्रकरण आधारित चर्चा,शोध निबंध,तज्ञांचे मार्गदर्शन असलेली सत्रे आणि प्रात्याक्षिक कार्यशाळा यांचा समावेश आहे. वैज्ञानिक कार्यक्रमांमध्ये मॉलेक्युलर डायग्नोस्टिक्स, अॅडव्हान्स्ड इमेजिंग, प्रिसिजन रेडिओ थेरपी,इम्युनोथेरपी पध्दती यांचा समावेश आहे.या परिषदेमध्ये आंतरराष्ट्रीय तज्ञ सहभागी होणार असून नेदरलँडस येथील प्रा. मार्टिन वॅन डेन बेंट,थायलंड येथील प्रा.डॉ.शानोप श्युएँगशोटी,जर्मनी येथील डॉ.अरिबा पटेल,युएसए येथील डॉ.संतोष केसरी,डॉ.विनय पुडुवल्ली,डॉ.दीपा संपत आणि डॉ.अश्वथा नारायणा यांचा समावेश आहे.न्युरो आँकोलॉजी व कर्करोग संशोधन क्षेत्रातील योगदानाकरिता त्यांची ओळख आहे. हा कार्यक्रम एका ऐतिहासिक टप्प्याशी सुसंगत आहे,ते म्हणजे - रूबी हॉल क्लिनिकच्या रेडिओ आँकोलॉजी विभागाचा ५० वा वर्धापन दिन.१९७६ मध्ये मुंबई बाहेरील महाराष्ट्रातील पहिली रेडिओ थेरपी सुविधा स्थापित केल्यापासून हा विभाग जीव वाचविणाऱ्या तंत्रज्ञानामध्ये नेहमीच अग्रेसर राहिला आहे.या विभागाच्या वारशामध्ये २००५ मध्ये आशियातील (जपान ) वगळता पहिले एमव्हीसीबीसीटी - आयजीआरटी आणणारे तसेच २०२३ मध्ये अॅडव्हान्स्ड सायबर नाईफ एस ७ तंत्रज्ञान आणण्याचा समावेश आहे. आजवर २५,००० रूग्णांवर उपचार आणि ५ लाख थेरपी सत्रे प्रदान करत हा विभाग आजही नाविन्य आणि अचूक उपचारांचे एक मार्गदर्शक दीपस्तंभ म्हणून उभा आहे. रूबी हॉल क्लिनिक चे चीफ कार्डिओलॉजिस्ट, अध्यक्ष व व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ.पी. के.ग्रांट म्हणाले की,आमच्या रेडिएशन आँकोलॉजी विभागाची ५० वर्षे साजरी करत असताना कर्करोग उपचारांच्या क्षेत्रात किती मोठी प्रगती झाली आहे,याचा आढावा घेण्यासाठी हा महत्त्वाचा क्षण आहे,तसेच भारतातील रूग्णांपर्यंत अत्यंत प्रगत आणि रूग्ण केंद्रित उपचार पोहचविण्याची आमची कटिबध्दता पुन्हा अधोरेखित करण्याची हीच वेळ आहे.यासोबतच आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही बालकाला उपचारांपासून वंचित राहावे लागणार नाही,याची खात्री करण्यासाठी आम्ही दृढ निश्चयी आहोत.

## कल्याण येथे सुतार कौशल्य विकास कार्यक्रमाचा समारोप; ३५० लाभार्थ्यांना प्रमाणपत्र

कल्याण : (समर्थ गांवकरी)

डी. वाय. फाउंडेशन महाराष्ट्र राज्य या सामाजिक संस्थेच्या वतीने आमने-लोणाड विभागातील सुतार कारागिरांसाठी आयोजित करण्यात आलेल्या सुतार कौशल्य विकास कार्यक्रमाचा समारोप सोहळा नुकताच उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कल्याण (पश्चिम) येथील आचार्य आत्रे सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात प्रशिक्षण पूर्ण केलेल्या ३५० लाभार्थ्यांना



प्रमाणपत्र, शिष्यवृत्ती तसेच सेफ्टी किटचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सुतार कामगार प्रशिक्षण पूर्ण केलेल्या सुमारे २२० लाभार्थ्यांनी स्वतः उपस्थित राहून आपले प्रमाणपत्र, इन्स्ट्रुमेंट्स व सेफ्टी किट स्वीकारले. कार्यक्रमात लाभार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

या कार्यक्रमाला प्रमुख मान्यवर म्हणून संस्थेचे युवा प्रदेशाध्यक्ष श्री. विरेन दयानंद चोरघे, इबको कंपनीचे संचालक श्री. सच्चिदानंद मिश्रा, दैनिक स्वराज्य तोरणचे संपादक डॉ. श्री. किशोर बळीराम पाटील, भाजपा सरचिटणीस श्री. तुकाराम बजागे, रस्ता सुरक्षा समन्वयक आरएसपी श्री. मनिलाल रतीलाल शिंपी, डी. वाय. फाउंडेशनचे अध्यक्ष श्री. योगेश पाटील, सल्लागार ह.भ. प. प्रकाश केणे, सल्लागार ह. भ.प. नवनाथ सुतार तसेच महिला ठाणे जिल्हाध्यक्षा सौ. चारूशिला गायकर यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, सदस्य आणि मोठ्या संख्येने लाभार्थी उपस्थित होते.

यावेळी इबको कंपनीचे संचालक श्री. सच्चिदानंद मिश्रा, दैनिक स्वराज्य तोरणचे संपादक डॉ. श्री. किशोर बळीराम पाटील आणि भाजपा सरचिटणीस श्री. तुकाराम बजागे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करत कौशल्य विकासाचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच प्रशिक्षण पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांचे कौतुक करून त्यांचे मनोबल वाढवले.

डी. वाय. फाउंडेशन महाराष्ट्र राज्यचे संस्थापक अध्यक्ष श्री. दयानंद मोतीराम चोरघे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला असून या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# महसूल अधिकाऱ्यांचे 'महा'वसुल राजस्व अभियान थांबवा

**खंडूराज गायकवाड, विशेष प्रतिनिधी मंत्रालय मुंबई**

पूर्वी याच कार्यालयात प्रक्रियांमध्ये वेळ, कागदोपत्री अडथळे आणि सामान्य नागरिकांना मानसिक त्रास हे ठरलेले सूत्र असायचे. जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, तहसीलदार, तलाठी कार्यालयात सतत लोकांची वर्दळ असायची. मात्र काळाबरोबर या महसूल विभागाने डिजिटल तंत्रज्ञानाचा स्वीकार करून संगणकीकरणाच्या माध्यमातून एक नवीन युग घडविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे महसूल खात्यातील अधिकाऱ्यांनी आता तरी मनोभावे लोकांची सेवा केल्यास त्यांना निश्चित कोणी सुळावर देणार नाही, तर एक दिवस प्रमाणिक काम केल्याबद्दल जनताच डोक्यावर घेवून नाचतील. म्हणूनच महसूल खात्यातील अधिकाऱ्यांनी 'महा'वसुल राजस्व अभियान टाळले तर गोरगरीब जनतेचे भरभरून आशीर्वाद मिळाल्याशिवाय राहणार नाही.



(स. गांवकरी)

जुन्नर -आंबेगाव उपविभागाचे प्रांताधिकारी गोविंद शिंदे यांच्यासह त्या कार्यालयात बरेच वर्ष ठाण मांडून बसलेले एक कर्मचारी खैरनार यांनी दोन लाख रुपयांची लाच घेतल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंध विभागाने (ACB) रंगेहाथ पकडल्याने महसूल प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे. यामुळे पुन्हा एकदा महसूल खात्यातील भ्रष्टाचाऱ्यांचा खरा चेहरा 'डिजिटल क्रांती'च्या महसूल अभियानात समोर येत आहे, हे या विभागातील प्रमुखांचे अपयश मानले पाहिजे. गाव तलाठ्या पासून ते महसूल खात्याच्या वरिष्ठ पातळीपर्यंत अनेक जमीन खरेदी- विक्री व्यवहारात सर्वांचे हात चुकीच्या मार्गाने बरबटलेले असतात. प्रत्येक सहीला 'धन लक्ष्मीचा' लाभ हा जणू काय आपला जन्म सिद्ध अधिकारच आहे, याचा महसूल कार्यलयातील अधिकाऱ्यांना दृढ आत्मविश्वास असतो. म्हणूनच वर्षातून एकदा आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व हे सेवा पंधरवडा अभियान सोडले की, वर्षांचे बारा महिने 'कमिशन इज मिशन' हे 'महा' राजस्व अभियान सुरू असते. त्यामुळे पोलिस खात्यानंतर राज्यातील प्रशासनात सर्वाधिक अधिकाऱ्यांच्या चौकशीची प्रकरणे ही महसूल विभागात आहेत.

दि. 28 मार्च 2026 रोजी जुन्नर -आंबेगांव उपविभागाचे प्रांताधिकारी गोंविद प्रभाकर शिंदे (वय -46) यांनी एका इमारतीचे अंशतः पूर्णत्व प्रमाणपत्र (कम्प्लिशन सर्टिफिकेट ) देण्यासाठी एका व्यावसायिकाकडून पाच लाख रुपयांची मागणी केली होती. मात्र तडजोडीअंती दोन लाख रुपये देण्याचा व्यवहार ठरला. अन दि. 28 मार्च 2026 रोजी प्रांताधिकाऱ्यांच्या कार्यालयातच एसीबीने शिंदे यांना दोन लाख रुपयांची लाच घेताना रंगेहात पकडले. या प्रकरणात कार्यालयातील खैरनार नावाचा कर्मचारी सहभागी आहे. विशेष म्हणजे हा कर्मचारी बरीच वर्षे या कार्यालयात ठाण मांडून बसला होता. त्याच्याशिवाय इथलं पान सुद्धा हालत नव्हतं अशी आता माहिती मिळत आहे. मात्र या प्रकरणाची दुसरी बाजू सुद्धा आता समोर येवू लागली आहे. यामध्ये प्रांताधिकारी शिंदे यांना अडकविण्याचा प्रयत्न झाला असल्याचे अनेकांचे म्हणणे आहे. अर्थात हा सर्व तपासाचा भाग आहे. यामध्ये चूक कोणाची हे तपासाअंती समोर येईलच पण कमी वयात एखाद्या अधिकाऱ्यांच्या अंगाला डाग लागला की, संपूर्ण सेवा कालावधीत त्याचा किती त्रास सहन करावा लागतो, हे नंतर लक्षात येते. अमाप पैसा मिळतो, पण लागलेला डाग कोणत्याही वॉशिंग पावडरने धुता येत नाही.

मात्र हे अनुभव फक्त एका कार्यालया पुरते नाहीत. राज्यातील सर्वच महसूली कार्यालयात 'मिशन इज कमिशन' हेच सर्वाधिक अभियान येथील अधिकारी आणि कर्मचारी राबवित असतात. याला प्रतिबंध घालायला अद्यापि कोणालाच यश आलेले नाही.

आजही महसूली प्रशासनाकडे एक कटाक्ष टाकला तरी साधा गावचा तलाठी आपल्या बापाचा हक्काचा असलेला सातबारा सुद्धा पैशाशिवाय हातात देत नाही. म्हणूनच भ्रष्टाचाराने पोखरलेल्या या महसूल प्रशासनात महिन्यात एक तरी असे प्रकरण घडते की, तलाठी, मंडलाधिकारी (सर्कल ) तहसीलदार, प्रांताधिकारी, सहाय्यक दुय्यम निबंधक किंवा भूमि अभिलेख अधिकारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईला सामोरे जातात.

नुकतीच मंत्रालयातील एका अधिकृत सूत्राकडून माहिती काढली असता, असे कळले की, सध्या राज्यात 200 पैकी 10 अतिरिक्त जिल्हाधिकारी, 600 पैकी 105 प्रांताधिकारी आणि 609 पैकी 209 तहसीलदारांवर विविध भ्रष्टाचारांच्या संशयित प्रकरणावरून चौकशा सुरू आहेत. नायब तहसीलदार, मंडलधिकारी आणि तलाठी यांच्या तक्रारींची तर हजारो प्रकरणे प्रत्येक विभागीय आयुक्त कार्यालयात पडून आहेत. याचा सरळ अर्थ हा आहे की, 'अर्थ'कारणाशिवाय कोणी ही यांच्या विरोधात तक्रार करण्याचे धाडस करणार नाही, अन आपल्या आयुष्याचा वेळ वाया घालविणार नाही.

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे रोज राज्यासाठी लोकाभिमुख निर्णय घेवून जनतेला खुश करतात. अनेक महत्वाचे लोकप्रिय निर्णय त्यांनी वर्षभरात घेतले. तुकडे बंदी कायदा शिथिल करणे, शेतकऱ्यांसाठी आवश्यक असलेला पाणंद रस्ता, चोवीस तास वाळू वाहतुकीला परवानगी, फेरफार अर्जाची ऑनलाईन व्यवस्था, खाजगी संस्थेकडून जमीन मोजणीला परवानगी, ई -मोजणी, ई -चावडी, खाणीचे ड्रोन द्वारे सर्वेक्षण, घरकुलांच्या लाभार्थ्यांसाठी पाच ब्रासपर्यत वाळू मोफत, झुडपी जंगल कायद्यात बदल, सन 2011पर्यंत निवासी अतिक्रमण नियमित करणे, प्रॉपर्टी कार्ड फेरफार ऑनलाईन करणे आणि महत्वाचे म्हणजे अकृषिक (एनए ) परवाना रद्द करण्याचा धाडसी निर्णय त्यांनी आपल्या कार्यकाळात घेतले. आजमितीस स्व. अजितदादा पवार यांच्या नंतर प्रशासनात वचक असलेले एकमेव मंत्री म्हणून महसूल मंत्री बावनकुळे यांच्याकडे पाहिले जाते. पण महसूल मंत्र्यांच्या एक गोष्ट लक्षात येत नसावी. तुम्ही जरी लोकहिताचे निर्णय घेतले असले तरी तुम्ही तुमच्या महसूल अधिकाऱ्यांच्या टेबलावरचे वजन कमी करीत आहात. त्यामुळे त्यांच्यात नाराजी वाढत चाललेली आहे. कदाचित आपण घेतलेले निर्णय संबंधित अधिकाऱ्यांना अजिबात आवडलेले नसतील. पण सांगणार कोणाला ? त्यामुळे अनेक अधिकाऱ्यांची घाळमेल झाली आहे. ते आता कोणाला सांगू शकत नाहीत. असो. तुमचे काम प्रामाणिक आहे. याबद्दल शंका नाही. महसूल विभागातील कलम 155 अंतर्गत जमिनीच्या फेरफार नोंदीचा गैरवापर करून घोटाळा केल्याप्रकरणी 152 तहसीलदार, मंडलाधिकारी आणि तलाठी यांच्यावर कारवाईचा बडगा महसूल मंत्र्यांनी उचलला आहे. आज त्यांनी हा घेतलेला निर्णय म्हणजे महसूल खात्याच्या अधिकाऱ्यांना सुतासारखे सरळ करण्याची त्यांची कदाचित ही मोहीम असावी.

सह दुय्यम निबंधक आणि भूमि अभिलेख कार्यालय म्हणजे हा दलालांचा अड्डा मानला जातो. येथे सामान्य माणूस दलालाशिवाय आपलं कामच करून शकत नाही. म्हणूनच पुण्यातील मुंढवा प्रकरणात सह दुय्यम निबंधक रवींद्र तारू आणि तहसीलदार सूर्यकांत येवले यांच्यासारखे मासे हाती लागले. अन कारवाईच्या कचाट्यात अडकले. यामागे व्यक्तीच्या महत्वाकांक्षेला मर्यादा नसतात, हे स्पष्ट होतेय. पगारापेक्षा अधिक वरकमाई यावी याच हेतूने आज या खात्यातील अगदी काल परवा नवीन रुजू झालेले अधिकारी 'शॉर्टकट मनी'च्या नादाला लागले आहेत. अनेक अधिकारी किती कष्टाने एमपीएससी परीक्षा देवून पास झालेले असतात. मग त्यांना हा मोह का आवरता येत नाही, हा पडलेला गहन प्रश्न आहे.

महसूल विभाग नागरिकांच्या दैनंदिन आयुष्याशी सर्वाधिक निगडीत विभाग आहे. ज्यामध्ये जमीन नोंदी, वारसा हक्क, विविध प्रमाणपत्र/दाखले सेवा, शेतकऱ्यांना दिले जाणारे अनुदान, आपत्ती व्यवस्थापन, कर संकलन, शेत सारा वसुली या सर्व कामाचा केंद्र बिंदू म्हणजे महसूल विभाग आहे. हा विभाग महाराष्ट्र सरकारचा महत्वाचा विभाग आहे.

या विभागाला एक शानदार इतिहास आहे. इतिहासाच्या विविध टप्प्यांमध्ये या विभागाने बदल घडवून यशस्वीपणे अनेक संकटात सामना केला. हाच महसूल विभाग राज्याच्या प्रशासनाचा कणा मानला जातो. या विभागाचे तीन प्रमुख घटक म्हणजे महसूल, नोंदणी व मुद्रांक आणि भूमि अभिलेख.

## थोडक्यात पण महत्वाचे




### महावीर जयंती पदयात्रेत महावीर प्रतिष्ठानच्या वतीने थंडपेय वाटप

अहिल्यानगर (स. गांवकरी) : महावीर प्रतिष्ठानच्या वतीने आज नगरमधून निघालेल्या पदयात्रेत सुमारे ४ हजार भाविकांना थंडपेय वाटप करण्यात आलेया उपक्रमाचे हे १६ वे वर्षे असून आनंदधाम येथे त्यासाठी मोठा पेंडॉल टाकण्यात आला होता. उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या मार्गदर्शखाली हे मंडळ विविध उपक्रम राबवित असते त्यातील हा एक उपक्रम आहे.

### शहरात दोन चिमुकल्यांना आमिष दाखवून छेडछाड, नराधमाला पकडले

अहिल्यानगर (स. गांवकरी) : शहरातील आनंदीबाजार परिसरात दोन अल्पवयीन मुलींना चॉकलेट आणि पैशांचे आमिष दाखवून त्यांच्याशी गैरकृत्य करण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका नराधमाला नागरिकांनी रंगेहात पकडून पोलिसांच्या हवाली केले. अमित सुभाष गवळी (वय २२, रा. विजयनगर, बोल्हेगाव) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी राकेश गाली यांची ७ वर्षांची मुलगी आणि त्यांच्या शेजाऱ्यांची ८ वर्षांची मुलगी सोमवारी सकाळी घरासमोर खेळत होत्या. यावेळी एका दुकानाच्या पायरीवर बसलेल्या अमित गवळी याने दोन्ही चिमुकल्यांना हाका मारून जवळ बोलावले. “मी तुम्हाला चॉकलेट आणि पैसे देतो,” असे आमिष दाखवून त्याने मुलींना आपल्याकडे ओढण्याचा प्रयत्न केला. घाबरलेल्या मुलींनी तातडीने घरात धाव घेऊन पालकांना हा प्रकार सांगितला. फिर्यादींनी बाहेर येऊन पाहिले असता आरोपी तेथेच बसलेला दिसला. त्याला हटकले असता त्याने पळून जाण्याचा प्रयत्न केला, मात्र फिर्यादी आणि इतर नागरिकांनी पाठलाग करून त्याला पकडले. यावेळी झालेल्या झटापटीत नागरिकांनी त्याला चांगलाच चोप दिला आणि पोलीस ठाण्यात नेले. पोलिसांनी चौकशी केली असता त्याचे नाव निष्पन्न झाले. अल्पवयीन मुलींशी गैरकृत्य करण्याच्या उद्देशाने हातवारे करून आमिष दाखवल्याप्रकरणी अमित गवळीविरुद्ध तक्रार देण्यात आली आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक के. एस. सेदवाड करत आहेत. चिमुकल्यांच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळल्याची भावना परिसरात व्यक्त होत आहे.

### धडाकेबाज निर्णय ; शेतकऱ्यांसाठी मोठी खुशखबर, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

अहिल्यानगर (स. गांवकरी) : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली काल (१ एप्रिल) राज्य सरकारची मंत्रिमंडळ बैठक घेण्यात आली. या मंत्रिमंडळाच्या बैठकीत महत्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. कालच्या बैठकीत मंत्रिमंडळाने सहा महत्त्वपूर्ण निर्णयांवर शिक्कामोर्तब केले. यामध्ये साकळाई उपसा सिंचन योजना, राज्य नदी पुनरुज्जीवर प्राधिकरण, अमरावतीमधील क्रीडा संकुल, अनुसूचित जाती उपवर्गीकरण निवेदन आणि दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीबाबतच्या निर्णयांचा समावेश आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील साकळाई उपसा सिंचन योजनेसाठी १ हजार २३४ कोटी रुपयांच्या तरतूदीस मान्यता. सुमारे ३२ अवर्षणग्रस्त गावांना लाभ होणार, ९ हजार ६०० हेक्टर क्षेत्राला सिंचन सुविधा मिळणार (जलसंपदा, विभाग) महाराष्ट्र राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण स्थापन. राज्यातील ५४ नदी प्रदुषित पट्ट्यांबाबत पूनरूज्जीवन प्रकल्प राबविणार. (पर्यावरण व वातावरणीय बदल, विभाग ) अमरावती महापालिकेला क्रीडा संकुलासाठी मौजे नवसारी येथील १६७०८ चौ.मी.जागा (महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क, विभाग) अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणाबाबत निवेदन, अर्जांबाबत मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती (सामाजिक न्याय विभाग) भूमि अभिलेख विभागात आता भूकरमापक पदाऐवजी परिरक्षण भूमापक पद. हे पद पदोन्नती व विभागीय भरतीद्वारे भरता येणार. राज्यातील भूकरमापक संवर्गातील कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा (महसूल विभाग) राज्यातील हजारो दिव्यांग विद्यार्थ्यांसाठीच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ. आठवी ते बारावीच्या दिव्यांग विद्यार्थांना मोठा दिलासा. बारा वर्षानंतर शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ (दिव्यांग कल्याण विभाग)

# साकळाई उपसा सिंचन योजनेस मंत्रीमंडळाची मंजुरी

**३२ गावांना मोठा दिलासा : ९६०० हेक्टर क्षेत्राला पाणी; १२३४ कोटींचा प्रकल्प चार वर्षांत पूर्ण होणार**

श्रीगोंदा : (स. गांवकरी)

श्रीगोंदा व अहिल्यानगर तालुक्यातील दुष्काळी ३२ गावांसाठी अत्यंत महत्त्वाची ठरणाऱ्या साकळाई उपसा सिंचन योजनेस अखेर राज्य मंत्रीमंडळाने मंजुरी दिली आहे. १ एप्रिल रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून, दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या या योजनेला आता गती मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सात वर्षांपूर्वी दिलेला शब्द पूर्ण करत या योजनेला हिरवा कंदील दिला. तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे आणि भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा निर्णय शक्य झाल्याचे मानले जात आहे.



या योजनेमुळे सुमारे ९६०० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार असून ३२ गावांतील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. अनेक दशकांपासून चर्चेत असलेली ही योजना निवडणुकांमध्येही महत्त्वाचा मुद्दा ठरत होती. आता तिच्या अंमलबजावणीचा मार्ग मोकळा झाला आहे.

या प्रकल्पासाठी सुमारे १२३४.१३ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून पुढील चार वर्षांत योजना पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या योजनेअंतर्गत चार टप्प्यांत पाणी उपसा केला जाणार असून चार पंपगृह आणि तीन वितरिकांद्वारे पाणी पुरवठा केला जाईल.

सुमारे २०८.३४ मीटर उंचीवर पाणी उचलून १.६० टीएमसी पाणी सिंचनासाठी तर ०.२० टीएमसी पाणी पिण्यासाठी उपलब्ध होणार आहे.

म्हैसगाव येथून पाणी उचलून चिखली आणि घुटेवाडी येथील डोंगरावरील वितरण हौदात सोडले जाणार आहे. यामुळे परिसरातील पाझर तलाव, सिमेंट नाला बंधारे आणि गाव तलावांचे पुनर्भरण होऊन भूजल पातळीत वाढ होण्यास मदत होईल.

दरम्यान, “बोले तैसा चाले” या भूमिकेतून दिलेला शब्द पूर्ण झाल्याची प्रतिक्रिया व्यक्त करत डॉ. सुजय विखे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि संबंधित नेतृत्वाचे आभार मानले.

साकळाई उपसा सिंचन योजनेला मिळालेली मंजुरी ही केवळ प्रशासकीय निर्णय नसून दुष्काळग्रस्त भागासाठी आशेचा किरण ठरणार आहे. प्रकल्प वेळेत पूर्ण झाल्यास हजारो शेतकऱ्यांच्या शेतीला नवसंजीवनी मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## माचनूर रस्त्यावरील पुलासाठी २ कोटींची मंजुरी

बिलोली : (स. गांवकरी)

बिलोली तालुक्यातील कुंडलवाडी–कोटग्याळ–माचनूर या महत्त्वाच्या रस्त्यावर पुलाच्या बांधकामासाठी २ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून, स्थानिक आमदार आ. अंतापूरकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा प्रश्न मार्गी लागला आहे. पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे नागरिक, विद्यार्थी यांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत होता. या निर्णयामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. बिलोली तालुक्यातील कुंडलवाडी–कोटग्याळ–माचनूर हा रस्ता अनेक गावांना जोडणारा प्रमुख दळणवळणाचा मार्ग असून, या मार्गावर पुलाचा अभाव ही दीर्घकाळापासूनची गंभीर समस्या होती. विशेषतः पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे या ठिकाणी पाण्याचा प्रवाह वाढत असल्याने रस्ता पूर्णतः खंडित होत असे. परिणामी, नागरिकांना तसेच विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून तारेवरची कसरत करत प्रवास करावा लागत होता. या परिस्थितीत अनेकदा शालेय विद्यार्थ्यांचे शिक्षणही खंडित होत होते, तर रुग्णवाहिका व अन्य अत्यावश्यक सेवा देखील ठप्प होत होत्या. गावकऱ्यांना अक्षरशः ‘वनवास’ सहन करावा लागत असल्याची भावना व्यक्त केली जात होती. दरम्यान, या समस्येची गांभीर्याने दखल घेत आ. अंतापूरकर यांनी सातत्याने शासनाकडे पाठपुरावा केला.

## आर्थिक नियोजन ही काळाची गरज - आदित्य चांदेकर

**सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचातर्फे व्याख्यानाचे आयोजन**

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

अन्न, वस्त्र, निवारा या जशा मनुष्याच्या मूलभूत गरजा आहेत. त्याचप्रमाणे आर्थिक नियोजन ही सुद्धा काळाची मूलभूत गरज आहे. भविष्याची वाटचाल चांगल्या पद्धतीने करण्यासाठी, आज प्रत्येकाने पैशाची नियोजन योग्य पद्धतीने करणे गरजेचे आहे. आपल्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी खर्चाचे तसेच वेळेचे नियोजन असणे महत्त्वाचे आहे. असे प्रतिपादन आर्थिक सल्लागार व ग्राहक पंचायतीचे सदस्य आदित्य चांदेकर यांनी केले. सावेडी जेष्ठ नागरिक मंच आणि ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने



आयोजित अर्थसंकल्प समजून घेताना आणि मृत्युपत्रा ची गरज या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. यावेळी ग्राहक पंचायत संस्थेचे अध्यक्ष गजेंद्र क्षीरसागर,कोषप्रमुख कृष्णराव बागडे, राजेंद्र कळमकर, ॲड.सिद्धार्थ वाघमारे, पंचायतचे उपाध्यक्ष दत्तात्रय सोनार मंच चे कार्यवाहक ज्योतीताई केसकर, एस आर जोशी, बलभीम पांडव, बाजीराव जाधव, मनोहर केसकर, हरिश्चंद्र थिगळे, पुष्पा चितांबर, शिरीष कुलकर्णी, वैशाली भणगे उपस्थित होते. यावेळी ते पुढे म्हणाले की, प्रत्येकाचे आज बँकेमधील खाते हे जॉईंट स्वरूपाचे असावे. आपल्या इच्छेने मृत्युपत्र सर्वांनी रजिस्टर पद्धतीने तयार करून ठेवावे. तसेच पेन्शनर लोकांनी आपल्या नातवंडांच्या शिक्षणासाठी पैसे योग्य तेथे गुंतवावे. राष्ट्रीयकृत बँकेत आपला आर्थिक व्यवहार असावा व त्यामध्येच आपल्या डिपॉझिट खाते असावे. अध्यक्ष गजेंद्र क्षीरसागर म्हणाले की, ग्राहक हा देव असतो. आपण सर्वजण जन्मल्यापासून मृत्यूपर्यंत ग्राहकच असतो. बिंदू माधव जोशी यांनी ग्राहकाचे अत्यंत सोपी व्याख्या केली आहे. ग्राहक नेहमी सजग राहिला पाहिजे. मंचच्यावतीने आदित्य चांदेकर व गजेंद्र क्षीरसागर यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शलाका रसाळ यांनी केले. तर आभार पुष्पा चितांबर यांनी मानले.

## वडझिरे येथे उद्या भव्य हनुमान मूर्ती मिरवणूक व प्राणप्रतिष्ठा सोहळा

अहिल्यानगर: (स. गांवकरी)

पारनेर तालुक्यातील वडझिरे येथील लंकेवाडी मध्ये श्री हनुमान मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. दैनिक कार्यक्रमांमध्ये बुधवार दिनांक 8 एप्रिल रोजी सकाळी 8 ते 11 या वेळेत श्री हनुमंतरायांच्या मूर्तीचा भव्य मिरवणूक सोहळा आयोजित करण्यात आला होता.



पारनेर तालुक्यातील वडझिरे येथील लंकेवाडी येथे हनुमान मूर्तीचा भव्य मिरवणूक सोहळा नूकताच संपन्न झाला.गावातील लंकेवाडी ते वडझिरे गावच्या मुख्य वेशीपासून मिरवणुकीला सुरुवात झाली.यावेळी पारंपारिक वाद्यांच्या गजरामुळे मिरवणुकीमध्ये रंगत वाढली. भाविक भक्तांच्या जय श्रीराम,जय हनुमान अशा गर्जनेमुळे वडझीरे परिसर दुमधुमून गेला होता. यावेळी सर्व महिला भाविक भगव्या रंगाच्या साडी मध्ये दिसत होते. वडझिरे परिसरातील वातावरण यावेळी भगवामय झाले होते. मिरवणूक गावातील विठ्ठल मंदिर परिसरामध्ये आल्यावर भाविक भक्तांनी फुगड्या खेळल्या. भगवा रंग या मिरवणुकीचे मुख्य वैशिष्ट्य ठरले.यावेळी ग्रामस्थान सह वडझीरे इंग्लिश मिडीयम स्कुलच्या मुलांनी लेझीमचा डाव खेळला. दुपारी बारा ते सहा पूजा व होमहवन सोहळा संपन्न झाला. एवढे हरिभक्त परायण राजाराम भाऊ महाराज झरेकर सद्गुरु माऊली आश्रम पारनेर यावेळी उपस्थित होते. सायंकाळी 9 नंतर लक्ष्मण कांत व लंके व पवनपुत्र एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक आणि वडझिरे इंग्लिश मीडियम स्कूलचे प्राचार्य जयसिंग बबनराव लंके यांचे वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

तसेच गुरुवार दिनांक 2 एप्रिल रोजी सकाळी 8 ते 12 या वेळेमध्ये परमपूज्य पंढरपूरकर गुरुजी यांच्या वेदमंत्रांनी हनुमान मूर्तीची प्रतिष्ठापना होनार आहें. तसेच सकाळी 10 ते 12 या वेळेमध्ये कैवाल्याचा पुतळा संत ज्ञानेश्वर महाराज चरित्र कथाकार, हभप गणेश महाराज वाघमारे, श्रीक्षेत्र विघ्नहर देवस्थान ओझर यांची सुश्राव्य प्रवचन रुपी सेवा आयोजित केलेली आहे. दुपारी 12 नंतर हनुमान तरुण मित्र मंडळ व समस्त ग्रामस्थ वडझिरे यांचे वतीने महाप्रसादाचे आयोजन केले आहे.

# नेते + ठेकेदार+निधी वजा गरीब = मार्च एंड (हेरंब कुलकर्णी)

(स. गांवकरी)

**हेरंब कुलकर्णी**

'दुष्काळ आवडे सर्वांना' या पी.साईनाथ यांच्या पुस्तकात त्यांनी गरीब मजुराचे उदाहरण दिले आहे. एका आदिवासी जमातीसाठी १७ लाख रुपये येतात व ते ३१ मार्चला खर्च करायचे असतात.त्या जमातीचे त्या भागात एकच कुटुंब असते. तो मजूर सांगतो की मला विहीर बांधून द्या. माझ्या शेतासाठी या पैशाचा उपयोग करा पण अधिकाऱ्यांना त्यात काय मिळणार ? शेवटी अधिकारी त्याच्या घराकडे जाणारा रस्ता बांधतात. ज्या माणसाकडे साधी सायकलसुद्धा नाही त्याच्यासाठी १७ लाख रुपयाचा रस्ता त्याच्या घरापर्यंत केला..ही आपल्या शासकीय यंत्रणेची ओळख आहे ...दर ३१ मार्चला मला हा प्रसंग आठवतो..

मार्चच्या शेवटच्या आठवड्यात कोणत्याही सरकारी कार्यालयात गेले ही हमखास मार्च एन्ड चे काम सुरू आहे हे ऐकायला मिळते. एखादी ग्रँट खर्ची टाकायची राहिली असेल तर लगेच ती खर्ची टाकून बिल टाकले जाते. मंत्रालयापासून जिल्हा परिषद पंचायत समिती ग्रामपंचायती पर्यंत फक्त बिले आणि कागदी जोडाजोडी सुरू असते. आलिशान गाड्यांतून आलेले ठेकेदार (रामदास फुटाणे यांच्या भाषेत 'चेका'ळलेले ठेकेदार!!) येत असतात .ते सारे आकडे बघितले की सरकार म्हणजे नेमके काय आणि कोणासाठी काम करते हे लक्षात येते. सरकारच्या बजेटवर आपण सामाजिक अंगाने चर्चा करतो परंतु त्या रकमांचा शेवटी विनियोग कोणासाठी होतो हे ३१ मार्चला समजते. कोणत्याही विभागाचे बजेट तयार करताना त्याचा विनियोग रस्ते,इमारती,बांधकाम, रेडिमेड वस्तू खरेदी अशामध्ये ती बसवली जाते जेणेकरून त्यात ठेकेदार नेमून कमिशन काढता येईल. त्यामुळे रस्ते, पूल, समाजमंदिरे यापलीकडे बजेटची उडी जात नाही. शिक्षण विभागात शालेय पोषण आहाराचे कोट्यवधीचे ठेकेदार, अंगणवाडीतील सर्व खरेदी, पोषण आहारात ठेकेदार,आश्रमशाळांना ठेकेदार, थोडक्यात सर्व कल्याणकारी योजना या ठेकेदारांमार्फत राबवल्या जातात. महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये दरवर्षी मोठ्या पेट्या भरून साहित्य येते,ते ठेवायला जागा नसते पण तरीही घ्यावे लागते...अतिशय सामान्य दर्जाचे साहित्य आणि त्याच्या किंमती प्रचंड असतात...अंगणवाडी आश्रमशाळेत तही अशीच खरेदी सुरू असते...सरकार म्हणजे




बांधकाम,रस्ते आणि खरेदी असेच समीकरण झाले आहे..

महापालिका, नगरपालिकेत नोकरभरती पासून सर्व योजना ठेकेदारांच्या चरणी वाहिल्या आहेत.

अगदी अनेक स्मारकांची घोषणा केल्यावर अनुयायी खुश होतात पण त्या स्मारकाचे रूपांतर योजनेत केले जाते व ती कामे पुन्हा ठेकेदारांना दिली जातात...तीर्थक्षेत्र विकास आराखडा म्हणजे पुन्हा बांधकामे आणि ठेकेदार...आमदार निधीतून हजारो मंदिरांचे सभामंडप बांधले गेले...टक्केवारी मिळते आणि धार्मिक लोक गावकरीही एकदम खुश होतात...रोजगारावर हा पैसा का खर्च करत नाही ? असा प्रश्न गावकरीही विचारत नाहीत.

> पूर्वी गावचे सरपंच व गावातील राजकीय कार्यकर्ते खूप आक्रमक असायचे.अधिकाऱ्यांना झापायचे पण आता ग्रामपंचायतीना निधी येऊ लागला..अनेक योजना आपल्या गावाला मिळाव्यात, आमदार खासदार निधीतून कामे व्हावीत यासाठी गावातील आक्रमक कार्यकर्ते या अधिकारी ठेकेदार साखळीला शरण गेले..आमदार खासदारांना धरून राहू लागली..काही त्या साखळीचा भाग होऊ लागले. आदिवासी विभागाचे आजपर्यंतचे सर्व बजेट एकत्र केले आणि त्याला सर्व आदिवासींच्या संख्येने भागले तर प्रत्येक आदिवासी कुटुंबाच्या खात्यात लाखो रुपये जमा झाले असते. कल्याणकारी योजना बंद करून थेट पैसे लाभार्थींना द्यावेत का असेच आता वाटू लागले आहे ...३१ मार्चला हे सारे माझ्या मनात येते आणि नंतर येणारा १ एप्रिल हा लोकशाहीने गरिबांना कल्याणकारी नावाखाली एप्रिल फुल केले आहे असेच वाटू लागते.

तेव्हा ठेकेदारांनी ठेकेदारांचा साठी ठेकेदारांचे चालवलेले सरकार म्हणजे लोकशाही अशीच नवी व्याख्या आज सरकार नावाच्या यंत्रणेची झाली आहे...

वास्तविक बजेटमधील तरतुदीचा वापर हा रोजगार निर्मितीसाठी व्हायला हवा. समाजकल्याण विभागाने दलित व भटके विमुक्त यांच्यातील रोजगार निर्मितीसाठी बजेट वापरायला हवे. आदिवासी विभागाने आदिवासी भागातील रोजगारासाठी निधी खर्च करायला हवा. रोजगार निर्मिती हेच बजेटचे प्रयोजन असायला हवे पण तसे होत नाही कारण रोजगारात काही टक्केवारी मिळत नसते..त्यामुळे राज्य कल्याणकारी आणि कल्याण मात्र जनतेचे न होता ठेकेदारांचे होते..दलित वस्ती सुधारणा असा एक निधी असतो. त्या निधीत त्या वस्तीत फक्त रस्ते बनतात,गटारी होतात आणि समाज मंदिर होते..का ? तर त्यात ठेकेदार बसवता येतो. त्या दलित वस्तीतील महिलांच्या बचत गटाला ते पैसे दिले तर महिलांचे व्यवसाय उभे राहतील.दलित तरूणांना ते पैसे बिन व्याजी कर्ज म्हणून दिले तर ती मुले उद्योग उभा करतील.... पण ते होणे नाही.. पूर्वी लोकप्रतिनिधी लाजेकाजेस्तव ठेकेदारांशी दुरून संबंध ठेवायचे पण त्यांच्या कार्यकर्त्यांनाच उपकृत करायला त्यांनी ठेकेदार करून टाकले आणि ठेकेदार हेच आज कार्यकर्ते झाले. काही लोकप्रतिनिधींचे कुटुंबातील सदस्य ही ठेकेदार होत आहेत .त्यांच्या नावावर कामाची बिले काढली जातात. ज्या प्रमाणात ही कामे वाढली. यातून जिल्हा परिषद पंचायत समिती व ग्रामपंचायतीचे राजकारण ठेकेदार केंद्रित होत गेले. ठेकेदारांनी त्या नेत्याचे कार्यकर्ते व्हायचे किंबहुना कार्यकर्त्यांचे रूपांतर नेत्याने ठेकेदारात करायचे असे सर्वत्र सुरू आहे.

आज निवडणुकीत वापरला जाणारा अमाप पैसा या ठेकेदाराच्या टक्केवारीतून आलेला आहे. खूप कामे आणायची.मतदार खुश आणि इकडे निवडणूक निधीही त्या टक्केवारीतून वाढत जातो.ठेकेदार हे निवडणूक काळात कार्यकर्ते होतात आणि पुढील कामांची गुंतवणूक करतात...मोठे महामार्ग,मोठे पूल,मोठे प्रकल्प राजकीय पक्षांच्या निवडणूक निधीची मोठी सोय असते.

शहरी भागात बिल्डर व ग्रामीण भागात ठेकेदार यांच्या हातात आज दोन्हीकडचे राजकारण गेले आहे हे कटू असले तरी वास्तव आहे.पुन्हा पक्ष सरकार कोणतेही असो हेच ठेकेदार व बिल्डर लोकप्रतिनिधींच्या जवळ असतात हे विशेष... सर्वपक्षसमभाव हे सूत्र..

राजकीय कार्यकर्ता ठेकेदार असल्याचा सर्वात वाईट परिणाम त्या कामाच्या गुणवत्तेवर होतो. लोकप्रतिनिधी पाठीशी आहेत या नावाखाली कामाचा दर्जा राखत नाही. अधिकाऱ्यांनाही नीट मूल्यमापन करू देत नाही व लोकही तक्रार करायची हिंमत करत नाही. त्यातून निकृष्ट कामे केली जातात पुन्हा दुरुस्तीची कामे तर ती न करता ही बिले टाकली जातात. आदिवासी दुर्गम भागात बघणारी यंत्रणाही अपुरी असल्याने कागदावर दुरुस्ती असे प्रकार होत राहतात... मोठे ठेकेदार थेट मंत्रालयाचे जावई असतात व त्या व्यवस्थेला त्यांनी लाभार्थी केलेले असते.

तीच गोष्ट अंगणवाडीची आहे. चिक्की घोटाळा ही फक्त झलक होती.. या सर्वांमध्ये महाराष्ट्राचे राजकारण नासते आहे ज्या प्रमाणात कल्याणकारी योजना आल्या, प्रत्येक कल्याणकारी योजनेचे रूपांतर ठेकेदारामध्ये झाले. स्वयंसेवी संस्था व ठेकेदार यांनी कल्याणकारी योजनांचा ताबा घेतला.राजकीय नेत्यांना त्याचे लाभार्थी केले. राजकीय नेतेही बजेट ठेकेदारीत जास्तीत जास्त कसे वापरता येईल याचा विचार करतात..आमदार खासदार निधी वाढत गेले त्यामुळे ठेकेदाराची प्रक्रिया अधिक गतिमान होते आहे...आणि कार्यकर्त्यांचे रूपांतर ठेकेदारात होणार आहे.

# माऊली सभागृहात गीतरामायणाची सुरेल मैफल

अहिल्यानगर: (स. गांवकरी)

जय श्रीराम श्रीरामनवमीच्या पावन दिनी माऊली सभागृहात संपन्न झालेल्या श्री प्रसादजी सोन्याबापू शेटे प्रस्तुत गीतरामायण या भक्तिमय सोहळ्याला रामभक्त नगरकरांचा उदंड प्रतिसाद लाभला. वेळेपूर्वीच तुडुंब भरलेलं माऊली सभागृह, कार्यक्रम सुरू झाल्यानंतर बाहेर माऊली सभागृहाच्या प्रांगणात एलईडी स्क्रीन समोर मोठ्या संख्येने उपस्थित भाविक नगरकर बघून हेच म्हणावसं वाटतं की आधुनिक वाल्मिकी ग. दि. माडगूळकर आणि स्वरतीर्थ सुधीर फडके यांच्या दैवी प्रतिभेतून निर्माण झालेल्या गीतरामायणाची गोडी आजही टिकून आहे. कवी श्रेष्ठ रवींद्रनाथांनी म्हंटल्याप्रमाणे रामायण ही खरोखरच भारताच्या मौलिक भावभावनांची भागीरथी आहे. भारतीय संस्कृती रामरसात सतत भिजत आलेली आहे



आणि गीत रामायण म्हणजे वाङ्‌मय शारदेच्या रत्नजडित मुकुटातील शिरोमणीच. याची पुनःप्रचिती यावर्षी देखील नगरकरांनी अनुभवली. गेल्या वर्षी प्रमाणे याही वर्षी श्रीराम नवमीच्या शुभ मुहूर्तावर श्री प्रसादजी शेटे यांच्या पुढाकारातून आणि मुख्य स्वरातून साकारलेल्या गीतरामायण या भक्तिमय सोहळ्याला आबाल वृद्ध नगरकरांनी प्रचंड गर्दी,उत्स्फूर्त टाळ्या आणि तोंड भरून दाद देत उदंड प्रतिसाद दिला. गीत रामायणातील ५६ गीतांपैकी स्वये श्री रामप्रभू ऐकती,कुशलव रामायण गाती, दशरथा घे हे पायस दान, ज्येष्ठ तुझा पुत्र मला देई दशरथा, नकोस नौके परत फिरू ग,सेतू बांधा रे सागरी, भूवरी रावण वध झाला, प्रभो मज एकच वर द्यावा, गा बाळांनो श्रीरामायण यांसह निवडक २१ गाणी गायली गेलीत. गायकांचे उत्तम स्वर, वादकांची उत्तम साथ आणि सोबत रामकथेची सुयोग्य गुंफण असा त्रिवेणी संगम या मैफिलीत जुळून आला. यावर्षीच्या मैफिलीचे प्रमुख आकर्षण होते, ज्यांनी खुद्द बाबूजी अर्थात सुधीर फडके यांना गीतरामायण कार्यक्रमांमध्ये साथ केलेली आहे असे दिग्गज व्हायोलिन वादक पंडित रमाकांत जी परांजपे यांची व्हायोलिनची साथ. पुण्याचे श्री शैलेश देशपांडे यांनी बासरी आणि संगमनेरचे श्री सत्यजित सराफ यांनी सिंथेसायझरची साथ केली. सोबत अहिल्यानगरचे ज्येष्ठ संगीत गुरु श्री मकरंद खरवंडीकर सर यांनी हार्मोनियमची साथ केली. तबला साथ होती श्री हर्षद भावे आणि श्री प्रसाद सुवर्ण पाठकी यांची तर तालवाद्य साथ होती श्री कुलदीप चव्हाण यांची. श्री प्रसाद जी शेटे यांच्यासह त्यांची कन्या सौ श्रद्धा बाजारे शेटे आणि नगरच्या सौ रेणुका पवार या दोघींनी सीता, कौसल्या, अहिल्या,शबरी यांच्या तोंडची गाणी सुरेल गायली. कोरस साथ होती कुमारी नेहा दरवडे आणि कुमारी गौरी पवार यांची. गायक वादकांच्या उत्तम सादरीकरणासोबतच या मैफिलीची जमेची बाजू म्हणजे सौ वीणा दिघे यांचे रामकथेचे प्रभावी प्रगल्भ निरूपण.

शेवटपर्यंत प्रेक्षकांना रामकथेमध्ये गुंतवून ठेवण्यात गायक वादक निवेदक यशस्वी ठरले. यावर्षी गीत रामायणातील काही गाण्यांसाठी श्री प्रसादची शेटे यांच्या स्नुषा सौ श्रद्धा शेटे यांनी सादर केलेले कथक नृत्य हे आणखीन एक आकर्षण ठरले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचा गौरव !

पुणे (स. गांवकरी) : दत्त परंपरेतील महान संत आणि शक्तिपात योगाचे अध्वर्यू प.पू. गुळवणी महाराज यांच्या दीक्षा शताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने, सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांचा सन्मान करण्यात आला. त्यांच्या अद्वितीय धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यासाठीचा हा सन्मान सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या वतीने सनातन संस्थेच्या सद्गुरु स्वाती खाडये यांनी स्वीकारला. शाल, श्रीफळ, मोत्यांची माळ आणि सन्मानचिन्ह असे सन्मानाचे स्वरूप होते. पुण्यातील एरंडवणे येथील ‘श्रीवामन निवास’ येथे ‘श्रीगुरु गौरव दीक्षा शताब्दी महोत्सव (२०२०-२०२६)’ हा दिमाखदार सन्मान सोहळा पार पडला. हा महोत्सव अनेक अर्थांनी महत्त्वपूर्ण ठरला. श्रीवासुदेव निवास स्थापनेचा हीरक महोत्सव, प.पू. ब्रह्मश्री श्रीदत्त महाराज कवीश्वर पुण्यतिथी रौप्य महोत्सव, प.पू. योगतपस्वी श्रीनारायणकाका ढेकणे महाराज जयंती शताब्दी महोत्सव, विद्यमान उत्तराधिकारी पू. शरदभाऊ जोशी यांचा ‘योगभक्ती अमृत महोत्सव’ होता. या प्रसंगी भारतभरातील २६ संतांचा सन्मान करण्यात आला. समाजाला सन्मार्ग दाखवण्याचे कार्य करणाऱ्या सत्पुरुषांचे आशीर्वाद मिळावेत, या उदात्त हेतूने ‘श्री प.पू. श्री वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराज व श्री प.पू. श्री लोकनाथतीर्थ स्वामी महाराज ट्रस्ट’च्या वतीने हे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात उपस्थित संतांनी साधनेचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचा प्रारंभ वेदमंत्रपठण, पादुकापूजन आणि ‘दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा’च्या जयघोषाने झाला. समारोप प.पू. टेंबे स्वामी विरचित ‘दत्त त्रिपदी’च्या व्हायोलिन वादनाने भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. श्री. शिरीषकुमार आणि श्री. अरुणकुमार उपाध्ये यांनी हे वादन सादर केले.

### जागतिक ऑटिझम जागरूकता दिन

पुणे (स. गांवकरी) : ऑटिझम ही मेंदूच्या विकासाशी संबंधित एक स्थिती आहे. यात मुलांच्या बोलण्याच्या क्षमतेवर, वागणुकीवर आणि सामाजिक संवादावर परिणाम होतो. ही कोणतीही संसर्गजन्य किंवा बरी होणारी आजारपण नसून एक वेगळेपण आहे, जे योग्य मार्गदर्शन आणि थेरपीच्या मदतीने सुधारता येते. लहान मुलांमध्ये ऑटिझमची काही महत्त्वाची लक्षणे दिसून येतात. जसेकी, मुलं नावाने हाक मारल्यावर प्रतिसाद देत नाहीत, डोळ्यांना डोळा मिळवत नाहीत, बोलायला उशीर होतो किंवा संवाद साधण्यात अडचण येते. काही मुलं एकाच गोष्टीत सतत गुंतलेली असतात किंवा एकाच हालचाली वारंवार करतात. अशी लक्षणे दिसल्यास पालकांनी दुर्लक्ष नकरता त्वरित तज्ञांचा सल्ला घ्यावा. योग्य वेळी निदान झाल्यास ऑटिझम असलेल्या मुलांमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा करता येते. स्पीच थेरपी, ऑक्युपेशनल थेरपी आणि बिहेवियर थेरपी यांसारख्या आधुनिक उपचार पद्धतींमुळे मुलांच्या संवाद कौशल्यात, वागण्यात आणि दैनंदिन जीवनातील कौशल्यांमध्ये सकारात्मक बदल घडवता येतो. आमच्या रुग्णालयात ऑटिझमसाठी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. येथे अनुभवी तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक मुलासाठी स्वतंत्र उपचार योजना तयार केली जाते. नियमित स्क्रीनिंग, सखोल मूल्यांकन आणि सातत्यपूर्ण थेरपीच्या मदतीने मुलांच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रितकेले जाते.

### संरक्षणाचे कोडे सोडवताना विमा रायडर्स महत्त्वाचे



पुणे (स. गांवकरी) : विम्याची संकल्पना आयुष्यातील अनिश्चिततेसाठी तयारी करण्याची आहे. ग्राहक जीवन विमा पॉलिसी खरेदी करतात तेव्हा समाविष्ट केली जाणारी प्राथमिक जोखीम म्हणजे मृत्यू; परंतु, जीवनातील असुरक्षितता फक्त या एकाच घटनेपुरती मर्यादित नसते. आजारपण, अपघात, अपंगत्व आणि उत्पन्न गमावणे हे एखाद्याच्या आयुष्यात तितकेच घातक असू शकतात.अनेकदा प्रामुख्याने काम करणारे व्यावसायिक आणि कुटुंबांसाठी, स्वतंत्र विमा पॉलिसींद्वारे या प्रत्येक जोखमीचे निराकरण करणे कठीण, महागडे आणि बोजड असू शकते. येथेच विमाधारक महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. रायडर्स, ज्यांना एड-ऑन असेही म्हटले जाते, हे पर्यायी लाभ आहेत जे त्याची व्याप्ती वाढवण्यासाठी मूलभूत विमा पॉलिसीशी जोडले जाऊ शकतात. अनेकदा स्वतंत्र पॉलिसी खरेदी न करता गंभीर आजार, अपघाती अपंगत्व किंवा उत्पन्नाची हानी अशा विशिष्ट जोखमींवर उपाय म्हणून त्यांची रचना केली गेली आहे.

### ज्युपिटर हॉस्पिटलमध्ये एकाच व्यक्तीचे तिसरे किडनी ट्रान्सप्लांट यशस्वी



पुणे (स. गांवकरी) : अत्यंत दुर्मिळ आणि गुंतागुंतीच्या वैद्यकीय प्रक्रियेत, पुण्यातील ज्युपिटर हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी ८ सप्टेंबर २०२५ रोजी एका रुग्णावर तिसरे किडनी प्रत्यारोपण यशस्वीपणे केले होते. अनेक वर्षे किडनीच्या आजाराशी झुंज देणाऱ्या या रुग्णाला या शस्त्रक्रियेमुळे आयुष्याची नवी संधी मिळाली. विशेष बाब म्हणजे दुसरे प्रत्यारोपण अयशस्वी झाल्यानंतर त्यांच्या पत्नीने पुढे येत स्वतःची किडनी दान केली. तिसरे किडनी प्रत्यारोपण अत्यंत दुर्मिळ मानले जाते आणि रुग्ण तसेच डॉक्टरांसाठीही हे तांत्रिकदृष्ट्या मोठे आव्हान असते. आधीच्या शस्त्रक्रियांमुळे शरीरात मोठ्या प्रमाणात जखमांचे ऊतक (scar tissue) तयार होते, त्यामुळे नवीन किडनी बसवण्यासाठी योग्य जागा आणि रक्तवाहिन्या शोधणे कठीण होते. याशिवाय अनेक वेळा प्रत्यारोपण झालेल्या रुग्णांमध्ये शरीराची प्रतिकारशक्ती अधिक संवेदनशील (immune sensitisation) होते, ज्यामुळे नवीन अवयव नाकारला जाण्याचा धोका वाढतो. श्री. प्रसाद (नाव बदलेले आहे) यांचा वैद्यकीय प्रवास २०१८ मध्ये सुरू झाला, जेव्हा त्यांना क्रॉनिक किडनी डिसीज (Chronic Kidney Disease) असल्याचे निदान झाले. त्याच वर्षी त्यांच्या आईने किडनी दान केल्यानंतर त्यांचे पहिले किडनी प्रत्यारोपण ते राहत असलेल्या शहरात करण्यात आले. मात्र २०२२ पर्यंत ती किडनी निकामी होऊ लागल्याने त्यांच्या बहिणीने किडनी दान करून दुसरे प्रत्यारोपण करण्यात आले. २०२५ मध्ये दुर्दैवाने दुसरी किडनी ‘बीके व्हायरस’मुळे झालेल्या गुंतागुंतीमुळे निकामी झाली. हा दुर्मिळ संसर्ग प्रत्यारोपित किडनीला नुकसान पोहोचवू शकतो. किडनीचे कार्य हळूहळू कमी होत गेल्याने त्यांना पुन्हा डायलिसिस सुरू करावा लागला. दुसऱ्यांदा प्रत्यारोपण केलेली किडनी जेव्हा निकामी झाली तेव्हा नव्या आयुष्याच्या आशेने श्री. प्रसाद यांनी पुण्यातील ज्युपिटर हॉस्पिटलशी संपर्क साधला.

# कलाकारांनी आरोग्य दिनानिमित्त सांगितले फिटनेस मंत्र

पुणे : (स. गांवकरी)

आजच्या वेगवान जीवनशैलीत, जिथे व्यस्त दिनक्रमामुळे आरोग्याकडे दुर्लक्ष होते, तिथे जागतिक आरोग्य दिन आपल्याला फिटनेस आणि स्वतःची काळजी घेण्याची आठवण करून देतो. टेलिव्हिजन कलाकार त्यांच्या व्यस्त शूटिंग असूनही, साध्या आणि प्रभावी सवयींमुळे आरोग्याला प्राधान्य देतात. या खास दिवशी अँड टीव्ही वर ‘घरवाली पेड़वाली’ मधील यक्षाची भूमिका साकारणारे अंकित मोहन आणि ‘भाबीजी घर पर हैं 2.0’ मधील अनीता भाभी भूमिका साकारणाऱ्या विदिशा श्रीवास्तव यांनी त्यांच्या फिटनेस सवयींबद्दल सांगितले. अंकित मोहन म्हणतात, "माझ्यासाठी फिटनेस म्हणजे कठीण व्यायाम नव्हे, तर सातत्य राखणे आहे. शूटिंगचे वेळापत्रक अनियमित असते, पण मी दररोज किमान 30 मिनिटे वर्कआउटसाठी काढतो. मला धावणे किंवा एखादा खेळ खेळणे आवडते. माझा आहार साधा, प्रोटीनयुक्त आणि घरगुती



असतो. मी साखर आणि प्रोसेस्ड फूड टाळतो. मानसिक आरोग्य देखील महत्त्वाचे आहे, म्हणून मी माइंडफुलनेसचा सराव करतो आणि मध्ये मध्ये ब्रेक घेतो. छोट्या सवयींचे सातत्य मोठा फरक घडवते." विदिशा श्रीवास्तव म्हणतात, "माझ्यासाठी फिटनेस म्हणजे आतून चांगले वाटणे. मी कठोर डाएट किंवा खूप कष्टदायक व्यायामावर विश्वास ठेवत नाही. मी दिवसाची सुरुवात कोमट पाणी आणि हलक्या स्ट्रेचिंग किंवा योगाने करते.

# रमेश घोलप यांचा संघर्ष आणि व्यक्तिमत्त्व प्रेरणादायी

पुणे : (स. गांवकरी)

"आयुष्यात यश मिळवण्यासाठी असंख्य क्षेत्रे उपलब्ध आहेत. प्रत्येकाने स्वतःची क्षमता व गुणवत्ता ओळखून योग्य क्षेत्र निवडल्यास यश मिळवता येते. एखादी व्यक्ती मोठ्या उंचीवर पोहोचल्यावर समाज तिचे कौतुक करतो; मात्र त्या यशामागील कष्ट व परिश्रमांकडेही लक्ष दिले पाहिजे. अतिशय कष्टातून पुढे येत रमेश घोलप सनदी अधिकारी झाले व स्वतंत्र ओळख निर्माण केली. त्यांचा संघर्ष आणि व्यक्तिमत्त्व सर्वांसाठी प्रेरणादायी आहे," असे प्रतिपादन प्रसिद्ध दिग्दर्शक नागराज मंजुळे यांनी केले.

आयएएस अधिकारी रमेश घोलप यांच्या जीवनप्रवासावर आधारित 'इथे थांबणे नाही' या पुस्तकाच्या सुधारित आवृत्तीचे प्रकाशन, तसेच उमेद प्रतिष्ठान निर्मित 'वाट रेखाटणारी पावलं' या मराठी, तर 'ग्राऊंडेड ग्लोरी' या इंग्रजीतील कॉफीटेबल पुस्तकाचे प्रकाशन नागराज मंजुळे व उद्योजक




## नागराज मंजुळे यांचे प्रतिपादन

हणमंतराव गायकवाड यांच्या हस्ते झाले. बार्शी येथील शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बी. वाय. यादव होते. प्रसंगी आमदार दिलीप सोपल, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विजय गरड, माय मिरर पब्लिकेशनचे मनोज अंबिके, ज्येष्ठ नेते प्रा. तानाजी ठोंबरे, डिजिटल मीडिया संघटनेचे राज्याध्यक्ष राजा माने, रमेश घोलप यांच्या मातोश्री विमल घोलप, पत्नी रूपाली घोलप आदी उपस्थित होते.

हणमंतराव गायकवाड म्हणाले, "करिअर निवडताना उद्योग क्षेत्राकडे सकारात्मकतेने पाहावे आणि वैयक्तिक यशाबरोबर समाजासाठी परत काहीतरी देण्याची जाणीव जपावी. रमेश घोलप यांनी संघर्षाच्या काळातील परिस्थितीची जाण ठेवत झारखंडमध्ये संवेदनशीलतेने केलेले काम मनाला भावले." गायकवाड यांनी वैयक्तिक आयुष्यातील संघर्षातून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उद्योग समूहाची ओळख निर्माण झाल्याची कहाणी सांगत विद्यार्थ्यांना प्रेरित केले.

रमेश घोलप म्हणाले, "ज्या परिसरात शिक्षण घेतले, त्याच ठिकाणी हा प्रकाशन सोहळा होतोय, हा आनंदाचा क्षण आहे. संघर्षाच्या काळात शिक्षक, मित्र, कुटुंबीय आणि नागरिकांनी साथ दिली. त्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम होणे ही मोठी कमाई आहे. भविष्यातही आपल्या मातीचे नाव उंचावण्यासाठी कार्यरत राहीन."

दिलीप सोपल यांनी आपल्या भाषणात रमेश घोलप यांच्या स्वर्गीय वडिलांसोबत असलेल्या मैत्रीच्या संबंधांचा भावनिक उल्लेख केला. बार्शीचा लेक झारखंडमध्ये जाऊन सर्वसामान्यांचा अधिकारी होतो, याचा अभिमान आहे.

# कोठारी बिल्डरविरोधात भर उन्हात धरणे आंदोलन

### आमदार बापूसाहेब पठारे यांचा पाठिंबा; दहा दिवसात घराचा ताबा मिळाला नाही, तर आत्मदहन




पुणे : (स. गांवकरी)

निर्धारित वेळेत घराची ९५ टक्के रक्कम देऊनही गेल्या दोन वर्षांपासून घराचा ताबा दिला जात नाही. याबाबत महारेरा आणि पोलीस प्रशासनाकडे दाद मागितली असता, कारवाई करण्यात टाळाटाळ होत आहे. कष्टाच्या पैशातून हक्काचे घर घेण्याचे स्वप्न पाहत कोट्यवधी रुपये दिले, मात्र पदरी निराशा आणि बेघर होऊन जगण्यापलीकडे काही लागलेले नाही. यामुळे खराडी येथील व्हर्टीलास को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीतील १०० हून अधिक सदनिकाधारकांनी आपल्या हक्काच्या घरासाठी भर उन्हात बुधवारी धरणे आंदोलन केले. दहा दिवसांत आम्हाला घराचा ताबा मिळाला नाही, तर आम्ही आत्मदहन करू किंवा इमारतीवरून उडी मारून जीव देऊ, असा निर्वाणीचा इशारा आंदोलकांनी यावेळी दिला.

आमदार बापूसाहेब पठारे यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन पीडितांशी संवाद साधला. तसेच खराडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधत कारवाई करण्याची मागणी केली. सदनिकाधारकांनी मांडलेल्या समस्या आणि त्यांच्या अडचणी काळजीपूर्वक ऐकून घेत, पठारे यांनी या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देण्याच्या सूचना पोलीस प्रशासनाला केल्या. इतक्या वर्षांपासून नागरिकांना न्यायासाठी संघर्ष करावा लागणे ही अत्यंत गंभीर बाब आहे आणि याकडे दुर्लक्ष सहन केले जाणार नाही, असे ते म्हणाले. आपण सदनिकाधारकांसोबत असून, त्यांना त्यांच्या हक्काच्या घराचा ताबा मिळवून देण्यासाठी पुढाकार घेणार असल्याचे सांगत त्यांनी आंदोलनकर्त्यांना धीर दिला.

'व्हर्टीलास सोसायटी"चे चेअरमन किशोरकुमार इंदुरे म्हणाले, "बिल्डर अरमान कोठारी आणि सिद्धांत कोठारी यांनी जुलै २०२४ मध्ये घराचा ताबा मिळेल, असे सांगितले होते. त्यासाठी जबरदस्तीने आमच्याकडून ९५ टक्के पेमेंट वसूल करून घेतले. मात्र, दिलेल्या मुदतीला दोन वर्षे उलटून गेले, तरी अजून ताबा मिळाला नाही. जवळपास १३० सदनिकाधारकांनी प्रत्येकी १.४० कोटी रुपये याप्रमाणे २०० कोटींपेक्षा अधिक रक्कम भरलेली असतानाही प्रकल्प अपूर्ण ठेवण्यात आला आहे. याप्रकरणी अनेकवेळा महारेरा, तसेच पोलीस प्रशासनाकडे पाठपुरावा केला. मात्र, कोणतीही ठोस कारवाई होत नाही.

# युरोमनी अवार्ड २०२६ मध्ये एचडीएफसी बँकेचा डबल सन्मान

मुंबई : (स. गांवकरी)

एचडीएफसी बँकेने युरोमनी प्रायव्हेट बँकिंग अवॉर्ड्स 2026 मध्ये दुहेरी यश संपादन करत ‘भारताची सर्वात सुरक्षित खासगी बँक’ आणि ‘भारताची सर्वोत्तम प्रीमियर बँक’ हा मान पटकावला आहे. हा प्रतिष्ठित सन्मान युरोमनी मासिकाकडून देण्यात आला. ‘भारताची सर्वात सुरक्षित खासगी बँक’ हा किताब मिळण्यामागे बँकेचे मजबूत भांडवली स्थैर्य, शिस्तबद्ध कर्जधोरण आणि जोखीम व्यवस्थापनातील ठोस पायाभूत तत्त्वे कारणीभूत ठरली आहेत. तर ‘सर्वोत्तम प्रीमियर बँक’ म्हणून गौरवण्यात बँकेची सातत्यपूर्ण कामगिरी, विविध उत्पादने, प्रगत डिजिटल सेवा आणि कर्मचाऱ्यांचा विकास यांचा महत्त्वाचा वाटा असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

यावेळी एचडीएफसी बँकेचे ग्रुप हेड – इन्व्हेस्टमेंट, प्रायव्हेट व इंटरनॅशनल बँकिंग तसेच डिजिटल इकोसिस्टम्सचे प्रमुख राकेश के. सिंग म्हणाले, “हा सन्मान आमच्या ग्राहकांप्रती असलेल्या निष्ठेचा आणि गेल्या तीन दशकांपासून त्यांनी आमच्यावर ठेवलेल्या विश्वासाचा पुरावा आहे. आमचे रिलेशनशिप मॅनेजर्स ग्राहकांच्या गुंतवणूक गरजा समजून घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन करतात. SmartWealth अ‍ॅपद्वारे आम्ही संपत्ती व्यवस्थापन अधिक सुलभ आणि वैयक्तिक अनुभव देणारे बनवले आहे.”

युरोमनी प्रायव्हेट बँकिंग अवॉर्ड्स हा जागतिक स्तरावरील प्रायव्हेट बँकिंग आणि वेल्थ मॅनेजमेंट क्षेत्रातील अत्यंत प्रतिष्ठित वार्षिक पुरस्कार सोहळा मानला जातो. गेल्या दोन दशकांहून अधिक काळ या पुरस्कारांद्वारे विविध श्रेणींमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या बँकांना गौरवण्यात येते.

# ज्ञानेश्वर, मुळा, वृध्देश्वर कारखान्यांच्या निवडणुका लांबणीवर

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

राज्यात जाहीर झालेल्या विधानसभा पोटनिवडणुकीमुळे सहकार विभागाने अहिल्यानगर आणि पुणे जिल्ह्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका ३१ मे २०२६ पर्यंत पुढे ढकलल्या आहेत. याबाबत सहकार विभागाने सोमवारी यासंदर्भातील शासन आदेश जारी केला. या आदेशाच्या दिनांकापासून सध्या सहकारी संस्थांच्या निवडणुका ज्या टप्प्यावर असतील त्या टप्प्यावर ३१ मे पर्यंत लांबणीवर टाकण्यात आल्या आहेत. या आदेशातून सहकारी गृहनिर्माण संस्थांना वगळण्यात आले आहेत. यामुळे नगर जिल्ह्यातील जिल्हा बँकेसह ज्ञानेश्वर, मुळा आणि वृध्देश्वर साखर कारखान्यांच्या





निवडणुका लांबवणार आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार आणि भाजपचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळे अनुक्रमे बारामती, राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी येत्या २३ एप्रिल रोजी मतदान होत आहे. या पोटनिवडणुकीमुळे प्रशासनिक आणि पोलीस यंत्रणा व्यग्र राहणार आहे. त्यामुळे सहकारी संस्थांच्या निवडणुकीसाठी आवश्यक मनुष्यबळ, पोलीस बंदोबस्त, मतदान केंद्रांची उपलब्धता याबाबत अडचणी निर्माण होण्याची शक्यता असल्याचे आदेशात म्हटले आहे.

परंतु, विभागाने सहकारी संस्थांच्या निवडणुकीनंतरची पहिली पदाधिकारी निवड करणे, संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष यांच्या राजीनाम्यामुळे अन्य पदाधिकाऱ्यांची निवड करणे, पदाधिकाऱ्याचा राजीनामा, मृत्यूमुळे रिक्त झालेल्या जागेवर अन्य संचालकांची निवड करणे, क आणि ड वर्गातील सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया, ज्या सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेत नामनिर्देशनाचा टप्पा सुरु झाला आहे, अशा निवडणुकांना हा आदेश लागू राहणार नसल्याचे सहकार विभागाने स्पष्ट केले आहे.

याबाबत गेल्या सोमवारी सायंकाळी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे सचिव अशोक गाडे यांनी स्वतंत्रपणे आदेश काढले आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यातील ज्ञानेश्वर, मुळा आणि वृध्देश्वर साखर कारखान्यांच्या निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादी प्रसिध्द झाली होती. या यादीवर सुचना आणि हरकती घेवून येत्या १ एप्रिलाला अंतिम मतदार यादी प्रसिध्द होणार होती. मात्र, राहुरी विधानसभेच्या पोटनिवडणुकीमुळे नगर जिल्ह्यातील सहकारातील अ व ब वर्गातील संस्था आणि बँकांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत. या निवडणूका ३१ मेपर्यंत होणार नसून त्यानंतर लगेच पावसाळा सुरू होणार आहे. पावसाळ्यात निवडणूका होत नसल्याने दिवाळीनंतर पावसाळा संपल्यावर आता जिल्हा बँकेसह ज्ञानेश्वर, मूळा आणि वृध्देश्वर साखर कारखान्यांच्या निवडणुका होणार आहेत. जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यातील ३ ब वर्ग विविध कार्यकारी विकास सोसायट्यांच्या निवडणुकीचा कार्यक्रम लावण्याच्या हालचाली जिल्हा सहाकर विभागाने सुरू केल्या होत्या. मात्र, राज्य सहकार निवडणूक प्राधिकरण यांनी नगर जिल्ह्यातील ब वर्ग व क वर्गातील संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्याचे आदेश दिल्याने या सोसायट्यांच्या निवडणुका आता दिवाळीनंतरच होणार आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे




## लॉकअपमधील महिलेकडे शरीर सुखाची मागणी; निलंबनाची कारवाई!

अकोला (स. गांवकरी) : "सदरक्षणाय खलनिग्रहणाय" या महाराष्ट्र पोलिसांच्या ब्रीदवाक्याला काळिमा फासणारी धक्कादायक घटना अकोला शहरात उघडकीस आली आहे. सिव्हिल लाईन पोलीस ठाण्याच्या लॉकअपमध्ये असलेल्या एका महिला आरोपीकडे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक (ASI) राजेश जाधव यांनी कथितरित्या शरीरसुखाची मागणी केल्याचा प्रकार समोर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ८० लाख रुपयांच्या आर्थिक अपहार प्रकरणात अटकेत असलेल्या महिलेला लॉकअपमध्ये ठेवण्यात आले होते. याच दरम्यान ड्युटीवर असलेल्या एएसआयने संबंधित महिलेच्या मुलीबाबत अश्लील चौकशी करत पैशांचे आमिष दाखवून तिला रात्री पाठवण्याची मागणी केल्याचा आरोप आहे. घटनेची माहिती मिळताच आर्थिक गुन्हे शाखेचे प्रमुख अनिल जुमळे यांनी तातडीने पोलीस ठाण्यात धाव घेत संबंधित अधिकाऱ्याला जाब विचारला. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर पोलीस वर्तुळात खळबळ उडाली आहे. दरम्यान, प्रकरणाची गंभीर दखल घेत अकोला जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक यांनी एएसआय राजेश जाधव यांना तत्काळ निलंबित केले असून त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. या घटनेमुळे पोलीस ठाण्यासारख्या सुरक्षित ठिकाणीही महिलांची सुरक्षा धोक्यात येत असल्याचा प्रश्न उपस्थित होत असून नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.



## भागवत सुनेवाड यांच्या 'माय' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन संपन्न

अर्धापूर (स. गांवकरी) : जिल्हा परिषद हायस्कूल, मालेगाव येथील उपक्रमशील, विद्यार्थी प्रिय, तंत्रस्नेही शिक्षक भागवत सुनेवाड यांनी लिखाण केलेल्या 'माय' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन नुकतेच प्रशालेच्या एका कार्यक्रमात शिवा कांबळे (साहित्यिक ) यांच्या हस्ते प्रकाशन संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती अनुजा देशपांडे या होत्या.तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ शिक्षिका विशाखा मजगे,मीनाक्षी मुपडे या होत्या.याप्रसंगी करुणा पवार, कोमल हिंगमिरे, विद्याताई वट्टमवार, श्रीकांत शिंदे, गजानन खुपसे,कल्पना हाडकर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राधा आटकोरे आणि श्रुती राऊत यांनी केले, तर आभार प्रदर्शन लेखक भागवत सुनेवाड यांनी मानले.या वेळी प्रशालेतील सर्व शिक्षक उपस्थित होते.

## किनवट तालुक्यातील थारा येथे महारेशीम अभियान नोंदणीचा शुभारंभ

नांदेड (स. गांवकरी) : किनवट तालुक्यातील थारा येथे 'महारेशीम अभियान' नोंदणीचा शुभारंभ सहायक जिल्हाधिकारी जेनीत चंद्रा दोन्तुला यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने रेशीम शेतीसाठी नोंदणी करून सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांनी केवळ पारंपरिक शेतीवर न थांबता वस्त्रोद्योगाशी जोडले जाणे आवश्यक आहे. शेतीत उद्योगाचा समावेश करून शेतकऱ्यांना उद्योजक बनविणे हे शासनाचे धोरण असून, रेशीम उद्योग हा त्यासाठी अत्यंत फायदेशीर पर्याय आहे. कार्यक्रमास जिल्हा रेशीम अधिकारी अशोक वडवळे, तालुका कृषी अधिकारी चंद्रकांत निमोड, क्षेत्र सहायक रेशीम कांचन जाधव, सहायक संचालक प्रवीण भुरके, प्रगतशील शेतकरी कपील सोनटक्के तसेच संबंधित विभागाचे अधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सहायक जिल्हाधिकारी जेनीत चंद्रा दोन्तुला पुढे म्हणाले की, या अभियानाला शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाल्यास शासनस्तरावर अधिक निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. वैयक्तिक स्तरावरही शेतकरी या योजनेचा लाभ घेऊ शकतात व आवश्यक त्या अनुदानासाठी सर्वतोपरी मदत केली जाईल. जिल्हा रेशीम अधिकारी अशोक वडवळे यांनी सांगितले की, पोकरा, मनरेगा व 'सिल्क समग्र' योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना प्रति एकरी चार लाख रुपयांपर्यंत अनुदान उपलब्ध आहे. समूहाच्या माध्यमातून रेशीम शेती केल्यास अधिक फायदा होऊन बाजारपेठेतही स्थिर उत्पन्न मिळू शकते.

# विद्यापीठ आणि मनपा यांच्या समन्वयाने कायापालट शक्य

### कुलगुरू डॉ मनोहर चासकर यांचे आवाहन



नांदेड जिल्हा: (स. गांवकरी)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वार्षिक स्नेहसंमेलन 'ज्ञानतीर्थ २०२६'च्या उद्घाटन समारंभाचा आज दि. १ एप्रिल, २०२६ रोजी विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात शुभारंभ झाला. या भव्य सोहळ्याने सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रमांच्या पर्वाची दिमाखदार सुरुवात झाली. विद्यापीठ परिसरातील विविध संकुलांतील विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर होते. प्रमुख पाहुण्या म्हणून नांदेड-वाघाळा महानगरपालिकेच्या महापौर कविता संतोष मुळे, तर विशेष उपस्थितीत किनवटचे आमदार भीमरावजी केराम हे होते. तसेच व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. बी. एस. सुरवसे यांचीही विशेष उपस्थिती लाभली. व्यासपीठावर कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत बाविस्कर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर, वार्षिक स्नेहसंमेलनाचे प्रभारी प्राध्यापक डॉ. पृथ्वीराज तौर यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. चासकर यांनी समाजाच्या प्रगतीसाठी विद्यार्थ्यांनी पुढे येत नव्या कल्पना मांडाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांकडून नाविन्यपूर्ण उपक्रमांची मागणी करण्यात आली असून विद्यार्थी सकारात्मक प्रतिसाद देतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. यावेळी महिला सक्षमीकरण व स्वच्छता क्षेत्रात कार्य करणाऱ्या कविताताई यांच्या कार्याचा उल्लेख करण्यात आला. नांदेड शहरातील नागरिकांच्या विविध समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

आणि नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका यांच्या संयुक्त विद्यमाने शहर विकासासाठी उपक्रम राबविल्यास शहराचा निश्चितच कायापालट होईल यासाठी विद्यार्थ्यांनी पुढे यावे, असे आवाहनही यावेळी त्यांनी केले. किनवटचे आमदार भीमरावजी केराम यांनी किनवट भागातील आदिवासी समाजाबद्दल सामाजिक भूमिका व्यक्त केली. किनवट परीसरातील आदिवासींचे सांस्कृतिक वैभव आणि कला जोपासण्याचे काम महाराष्ट्र शासनातर्फे होत आहे. यामध्ये विद्यापीठाची भूमिका महत्वाची आहे. याप्रसंगी राष्ट्रीय युवक महोत्सवातील विजेत्या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी त्यांच्या यशाचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन वार्षिक स्नेहसंमेलनाचे प्रभारी प्राध्यापक डॉ. पृथ्वीराज तौर यांनी केले.

### युवकांनी कुटुंब, समाज व देशासाठी योगदान द्यावे – महापौरांचे आवाहन

महापौर कविता मुळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना युवकांनी केवळ स्वतःपुरते मर्यादित न राहता कुटुंब, समाज आणि देशाच्या विकासासाठी आपल्या शिक्षणाचा उपयोग करावा, असे आवाहन महापौरांनी केले. भारतीय संस्कृतीत कुटुंब संस्था अत्यंत महत्त्वाची असून कुटुंब सशक्त केल्याशिवाय समाज आणि देश सुदृढ होऊ शकत नाही, असेही त्यांनी नमूद केले. राष्ट्रीय युवक महोत्सवातील विजेत्यांचा सन्मान करताना त्यांनी त्यांच्या परिश्रमाचे कौतुक केले. यश सहज मिळत नाही, त्यासाठी कठोर मेहनत व सातत्य आवश्यक असते. नांदेड शहराच्या विकासासाठी विद्यापीठाची आणि विद्यार्थ्यांच्या संशोधनाची निश्चितच मदत घेण्यात येईल. यासाठी विद्यापीठ प्रशासनाने आम्हाला मार्गदर्शन करावे. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी नांदेड महानगर पालिका सदैव कटीबद्ध आहे. युवकांनी चांगल्या सवयी अंगीकाराव्यात, पुस्तकांशी मैत्री करावी, योग्य संगत ठेवावी व प्रश्न विचारण्याची सवय जोपासावी, असे मार्गदर्शन त्यांनी केले. तसेच विद्यापीठ व स्थानिक स्वराज्य संस्था एकत्रितपणे कार्य केल्यास सक्षम, संस्कारित व स्वच्छ समाज घडविणे शक्य असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## डीसीपी विक्रम साळी यांचा आदर्श



ठाणे : (स. गांवकरी)

सध्या राज्यभर सुरू असलेल्या पोलीस भरती प्रक्रियेत छत्रपती संभाजीनगर येथील SRPF गट क्रमांक 14 मध्ये घडणारे चित्र हे केवळ भरती प्रक्रियेपुरते मर्यादित न राहता, एक जिव्हाळ्याचा, माणुसकीचा आणि संवेदनशीलतेचा आदर्श ठरत आहे. या भरतीचे नेतृत्व करणारे डीसीपी तथा कमांडंट विक्रम साळी यांनी संपूर्ण प्रक्रियेला केवळ प्रशासनिक चौकटीत न ठेवता, "उमेदवार हेच केंद्रबिंदू" मानत एक वेगळीच ऊब दिली आहे. भरतीसाठी दूरदूरवरून आलेल्या युवक-युवतींच्या डोळ्यांत स्वप्नं आहेत, आशा आहेत... आणि त्या स्वप्नांना आधार देणारे हे नियोजन आहे. उमेदवारांना कोणतीही अडचण येऊ नये म्हणून केलेली सूक्ष्म तयारी, वैद्यकीय तपासणीतील पारदर्शकता, ग्राउंडवरील शिस्तबद्ध पण मानवी स्पर्श असलेले व्यवस्थापन – हे सर्व पाहता ही भरती केवळ प्रक्रिया न राहता एक अनुभव बनली आहे.

विशेष म्हणजे येथे अधिकारी आणि उमेदवार यांच्यातील नातं हे केवळ औपचारिक न राहता संवादाने, विश्वासाने आणि समजुतीने बांधलेले दिसते. उमेदवारांच्या चेहऱ्यावर दिसणारे समाधान, त्यांच्या शब्दांतून व्यक्त होणारी कृतज्ञता – हेच या उपक्रमाचे खरे यश आहे.

*एसओटीसी ट्रॅव्हलने आपल्या 'दर्शन' आध्यात्मिक पॅकेजेसच्या प्रचारासाठी*

## पद्मश्री अनुराधा पौडवाल यांच्याशी सहकार्य केले जाहीर

पुणे : (स. गांवकरी)

ओम्नीचॅनल ट्रॅव्हल आणि टुरिझम कंपनी एसओटीसी ट्रॅव्हलने आपल्या आध्यात्मिक पॅकेजेसच्या श्रेणीसाठी प्रख्यात गायिका आणि पद्मश्री अनुराधा पौडवाल यांच्याशी विशेष सहकार्य जाहीर केले आहे. भारतामध्ये आध्यात्मिक पर्यटनाला सातत्याने मजबूत गती मिळत असताना, प्रवासी अधिकाधिक श्रद्धा, संस्कृती आणि अर्थपूर्ण अनुभव यांचा संगम असलेल्या प्रवासाच्या शोधात आहेत. या सहकार्याद्वारे, एसओटीसी भक्तांशी आपला संवाद अधिक दृढ करण्याचा आणि प्रवाशांना भारत तसेच भारतीय उपखंडातील नियोजित तीर्थयात्रा अनुभवांचा शोध घेण्यासाठी प्रेरित करण्याचा उद्देश ठेवते. एसओटीसीच्या 'दर्शन' पोर्टफोलिओमध्ये विचारपूर्वक आखलेले आध्यात्मिक प्रवास समाविष्ट आहेत, जे सुलभ प्रवासासोबत अर्थपूर्ण भक्तीपूर्ण अनुभवांचा संगम घडवतात.




या पॅकेजेसमध्ये नियोजित प्रवास आराखडे, उपलब्धतेनुसार पूजा विधी व दर्शन सहाय्य, आरामदायी निवास, शाकाहारी भोजन आणि समर्पित टूर मॅनेजर्सचा समावेश आहे. हे प्रवास वरिष्ठ नागरिकांसाठी अनुकूल रितीने डिझाइन केलेले असून, प्रवाशांच्या आराम आणि सुलभतेची खात्री देतात. श्री एस.डी. नंदकुमार, प्रेसिडेंट आणि कंट्री हेड– हॉलिडेज आणि कॉर्पोरेट टूर्स, एसओटीसी ट्रॅव्हल, म्हणाले, "भारतामध्ये आध्यात्मिक पर्यटनाला मोठी चालना मिळत आहे, कारण प्रवासी आता अधिक अर्थपूर्ण आणि श्रद्धेशी निगडित प्रवास शोधत आहेत. आमच्या 'दर्शन' पोर्टफोलिओद्वारे, आम्ही असे तीर्थयात्रा अनुभव निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहोत, जे भक्तीबरोबरच आराम, सुलभ नियोजन आणि विचारपूर्वक आखणी यांचा संगम साधतात. आमचा भर प्रवास प्रक्रिया सुलभ करण्यावर आहे, जेणेकरून भक्त पूर्णपणे आपल्या आध्यात्मिक प्रवासावर लक्ष केंद्रित करू शकतील. या सहकार्याबद्दल आपले विचार व्यक्त करताना, पद्मश्री अनुराधा पौडवाल म्हणाल्या, "भक्ती संगीत हे नेहमीच लोकांना श्रद्धेशी जोडण्याचे आणि आध्यात्मिक शांतता अनुभवण्याचे एक माध्यम राहिले आहे. तीर्थयात्राही त्याच भक्ती आणि आत्मचिंतनाच्या भावनेला घेऊन येतात. एसओटीसीच्या 'दर्शन' उपक्रमाशी जोडले जाणे माझ्यासाठी अत्यंत आनंददायी आहे, कारण यामुळे भक्तांना पवित्र स्थळांचा अनुभव आरामात आणि सुलभतेने घेता येतो. या विचारपूर्वक तयार केलेल्या आध्यात्मिक प्रवासांद्वारे, प्रवासी तीर्थयात्रेच्या गाभ्याच्या उद्देशावर लक्ष केंद्रित करू शकतात आणि या स्थळांच्या आध्यात्मिक ऊर्जेत स्वतःला मग्न करू शकतात.

## ट्रॅक्टरच्या गावात 'नवरदेव' ओढतात रेल्वेसारख्या बैलगाड्या

अर्धापूर : (स. गांवकरी)

- उमरीच्या यात्रेची अजब परंपरा
- माणूस बनला 'बैल' उमरीत नवरदेवांनी ओढली बैलगाड्यांची रेल्वे

आधुनिक युगात विज्ञानाने कितीही प्रगती केली असली, तरी काही परंपरा आजही आपल्याला थक्क करून सोडतात. अर्धापूर तालुक्यातील उमरी येथे ग्रामदैवत मारोतीराया च्या भरणाऱ्या यात्रेचे असेच एक विलोभनीय आणि अंगावर शहारे आणणारे रूप पाहायला मिळते. ज्या गावाची ओळख 'ट्रॅक्टरचे गाव' म्हणून आहे, तिथे आजही नवस फेडण्यासाठी माणूस स्वतः बैल बनून गाड्या ओढतो. उमरी येथील यात्रेचे मुख्य आकर्षण म्हणजे 'मानवी रेल्वे'. येथे रेल्वेच्या डब्यांप्रमाणे एकमेकांना अनेक बैलगाड्या



जोडल्या जातात. आश्चर्य म्हणजे या गाड्या ओढण्यासाठी बैल नसून, नवस बोललेला 'नवरदेव' (भक्त) स्वतः जुवाखाली उभा राहतो. नवस फेडणाऱ्या नवरदेवाच्या अंगावर घोंगडे टाकले जाते. तो आपल्या खांद्यावर बैलगाडीचा धुरा (जू) घेतो आणि ताकदीने गाड्या ओढतो. गाडी ओढत असताना चालत्या जुवावर कुऱ्हाडीने नारळ फोडण्याची थरारक परंपरा आहे. हा मान गावातील सुतार रामू पांचाळ यांना असून, ते धावत्या गाडीवर बसून हे कसब दाखवतात. पहिल्या गाडीत नवरदेवाचे सकोणे आणि करवल्या बसतात, तर मागील गाड्यांमध्ये गावातील लहान मुले उत्साहाने स्वार होतात.

या यात्रेचे पावित्र्य जपण्यासाठी संपूर्ण गाव सलग पाच दिवस उपवास धरते. या काळात गावात कीर्तन आणि विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असते. दुपारी दोन वाजल्यापासून ते अंधार पडेपर्यंत सुमारे १५ ते २० नवरदेव एकापाठोपाठ एक गाड्या ओढून आपला नवस पूर्ण करतात. सायंकाळी घरोघरी पुरणपोळीचा नैवेद्य दाखवून हा उपवास सोडला जातो . तर रात्रीच्या वेळी या उत्सवाचा उत्साह शिगेला पोहोचतो. ढोल-ताशांच्या गजरात गावात ५० फूट उंच काठी नाचवली जाते. रात्री ९ ते पहाटे २ वाजेपर्यंत निघणाऱ्या या मिरवणुकीत सर्व धर्मीय बांधव मोठ्या संख्येने सहभागी होतात. हे दृश्य सामाजिक एकतेचा एक मोठा संदेश देते.

### जाती-धर्माच्या पलीकडची यात्रा

पन्नास फुटी काठीच्या मिरवणुकीत जेव्हा सर्व धर्मीय एकत्र येतात, तेव्हा उमरीची ही 'मानवी रेल्वे' केवळ गाड्या ओढत नाही, तर माणसाला माणसाशी जोडण्याचं काम करते. याचा आम्हा गावकऱ्यांना अभिमान आहे.

**- डॉ.विशाल गवळी ग्रामस्थ उमरी**

लग्न व्हावे, संतती प्राप्ती व्हावी किंवा व्यवसायात यश मिळावे, यासाठी भाविक येथे नवस बोलतात. ट्रॅक्टरच्या या युगातही आपली जुनी परंपरा टिकवून ठेवण्यासाठी संपूर्ण गाव एकत्र येते, हेच आमचे वैशिष्ट्य आहे.

**- अर्जुन गवळी उपसरपंच, उमरी**

## हायब इंडिया कडून देशव्यापी गर्ल ग्रुप ऑडिशनची घोषणा

पुणे : (स. गांवकरी)

हायब इंडिया ने आज जाहीर केले की त्यांनी नवीन गर्ल ग्रुप ऑडिशनसाठी अर्ज खुले केले आहेत. टॅलेंट स्काऊटिंग 31 मार्च ते 31 जुलै 2026 दरम्यान होणार आहे.

या ऑडिशनमध्ये भारतभरातील 2005 ते 2011 दरम्यान जन्मलेल्या महिला टॅलेंटना आपली व्यक्तिमत्व आणि क्रिएटिव्हिटी दाखवण्याची संधी मिळणार आहे. अर्जाच्या कॅटेगरीमध्ये व्होकल्स, रॅप, डान्स, अभिनय, मॉडेलिंग आणि इतर परफॉर्मन्स प्रकारांचा समावेश आहे.

गर्ल ग्रुपवर लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय हा हायब इंडिया ने मागील काही वर्षांत केलेल्या ऑनलाइन आणि इन-पर्सन रिसर्चवर आधारित आहे. नील्सन सोबत केलेल्या देशव्यापी क्वांटिटेटिव्ह स्टडी आणि सहा प्रमुख शहरांतील क्वालिटेटिव्ह रिसर्चमधून हे स्पष्ट झाले की तरुण भारतीय महिलांना




अशा कलाकारांची अपेक्षा आहे जे त्यांच्या आवाजाचे प्रतिनिधित्व करतील आणि प्रेरणादायी रोल मॉडेल ठरतील. यावरून हायब इंडिया ने 'हार्मनी इन डायव्हर्सिटी' या संकल्पनेतून भारतीय महिलांच्या खरी कहाणी आणि आवाज जागतिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचवणाऱ्या गर्ल ग्रुपची संधी ओळखली.

# वासुंदे, पळशी, खडकवाडी भागात घरांचे पत्रे उडाले

- बेभान वादळामुळे अनेक कुटुंबे रस्त्यावर; घरांवरील पत्रे अन् गोठ्यांची झाली पडझड!
- पारनेरच्या उत्तर भागात निसर्गाचा कोप
- बेभान वादळ अन् गारपिटीने जनजीवन विस्कळीत; बळीराजा पुरता कोलमडला!
- पारनेरमध्ये गारपिटीचा सलग दुसऱ्या आठवड्यात तडाखा; प्रशासन कधी जागे होणार?

पारनेर : (स. गांवकरी)

पारनेर तालुक्याच्या उत्तर भागात निसर्गाने थैमान घातले आहे. वासुंदे,



पळशी, वनकुटे, खडकवाडी आणि वडगाव सावताळ परिसरात बुधवारी सायंकाळी अचानक आलेल्या बेभान वादळी वाऱ्यासह जोरदार गारपीट झाली . या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला असून, अनेक कुटुंबांचे संसार उघड्यावर पडले आहेत . घरावरील पत्रे उडणे, विजेचे खांब कोलमडणे आणि शेती पिकांचे कोट्यवधींचे नुकसान झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

गेल्या आठवड्यात झालेल्या गारपिटीतून शेतकरी सावरत असतानाच पुन्हा एकदा निसर्गाने घाला घातला. वासुंदे परिसरातील बोकनकवाडी, शिक्री, खडकवाडीतील जांभळवाडी तसेच पळशीतील चिमणीबारव भागात वारे इतक्या वेगाने वाहत होते की बघता बघता उभ्या पिकांचे नुकसान झाले. प्रामुख्याने कांदा, मिरची, झेंडू, टरबूज, डाळिंब, गहू आणि आंबा या पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. तसेच उन्हाळ्यासाठी साठवून ठेवलेला ज्वारी आणि बाजरीचा वैरणीचा चारा पावसात भिजल्याने कुजण्याची भीती निर्माण झाली असून जनावरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न उभा ठाकला आहे. वादळाचा वेग इतका भीषण होता की अनेक भागांत घरांवरील आणि गोठ्यांवरील पत्रे कागदासारखे उडून गेले. वासुंदे येथील बबन बोरुडे यांच्या घराचे पत्रे उडाल्याने त्यांचा पूर्ण संसार रस्त्यावर आला आहे. बन्सी गोवर्धन राठोड यांच्या घरावर झाड कोसळले, तर राजेंद्र शिरतार आणि विठ्ठल जेडगुले यांच्या घरांचे व जनावरांच्या गोठ्यांचे नुकसान झाले आहे. पळशी येथील राघू सोमा मधे आणि बाबाजी किसन जाधव यांची घरे पडल्याने ही कुटुंबे उघड्यावर पडली आहेत. खडकवाडीत राघू केदार, पोपट केदार, बुवाजी जाधव आणि शंकर केदार या गरीब शेतकऱ्यांच्या घरांचे अतोनात नुकसान झाले असून एका किराणा दुकानालाही वादळाचा मोठा तडाखा बसला आहे. आधुनिक शेतीसाठी बसवलेले सौर पॅनलही या गारपिटीतून सुटू शकले नाहीत. वासुंदे येथील माजी सरपंच रंगनाथ सैद, ताराबाई सैद आणि रामदास शिरतार यांच्या विहिरीवरील सौर पॅनल गारपिटीमुळे तुटले व उडून गेले आहेत, ज्यामुळे त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. वाबळे वस्तीवर विजेच्या तारा तुटल्या असून अनेक ठिकाणी विजेचे खांब पडल्याने संपूर्ण परिसराचा वीजपुरवठा खंडित झाला आहे. दिलीप भागाजी पाटोळे यांच्या जनावरांच्या गोठ्याचेही मोठे नुकसान झाले आहे. मारुती भालेकर यांच्या कंपाउंडमध्ये विजेचा पोल पडल्याने मोठी भीती निर्माण झाली होती. साहेबराव गुंजाळ यांच्या शेती पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. या भागात शेतीसोबतच मोठ्या प्रमाणावर वीटभट्टी व्यवसाय चालतो, मात्र अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे कच्च्या विटांचे पाणी झाले असून, वीट व्यावसायिकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. हवामान खात्याने पुढील २-३ दिवस पुन्हा अशाच पावसाचा अंदाज वर्तवल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर, नुकसानग्रस्त भागाचे त्वरित पंचनामे करून बाधितांना तातडीने आर्थिक मदत देण्याची मागणी जोर धरत आहे. ज्यांची घरे पडली आहेत त्यांना नवीन घरे बांधून द्यावीत आणि पिकांच्या नुकसानीची भरपाई थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी, अशी आर्त हाक ग्रामस्थांनी प्रशासनाकडे केली आहे.

### प्रशासनाने आता कागदी घोडे नाचऊ नका!

निसर्गाच्या लहरीपणाने शेतकरी पुरता उद्ध्वस्त झाला आहे. हाताशी आलेला कांदा, फळबागा आणि राहती घरेही गारपिटीने हिरावून नेली आहेत. प्रशासनाने आता केवळ कागदी घोडे न नाचवता, तातडीने या भागाचे पंचनामे करून थेट आर्थिक मदत द्यावी, हीच आमची मागणी आहे; अन्यथा बळीराजा पूर्णपणे कोलमडून पडेल. अशी मागणीच माजी चेअरमन दिलीप पाटोळे यांनी केली आहे.

दोन दिवसांच्या वादळी पावसाने अनेकांचे संसार उघड्यावर आणले आहेत. घरांचे पत्रे उडाले असून पावसाच्या भीतीमुळे रात्र जागून काढावी लागत आहे. सरकारने केवळ पिकांचीच नाही, तर ज्यांची घरे पडली आहेत आणि ज्यांचे सौर प्रकल्प फुटले आहेत, त्यांनाही विशेष नुकसान भरपाई देऊन आधार द्यावा, ही विनंती आहे.

**- सचिन सैद (वासुंदे, शिक्री)**